विलायतेतील कादंबऱ्या (धनुर्धारी रचित)

पश्चात्ताप्यांचा पांजरापोळ.

भाग १ ला.

(पोलीसचा पश्चाताप.)

प्रकाशकः—ल. वें. मांजरेकर आणि कंपनी.

मोती बाजार, कालिकादेवी पोष्ट, मुंबई.

किंमत सहा आणे. टपाल खर्च अर्धा आणा.

जगदीश्वर छा. छा.

वाचकांस विनंति.

"पश्चात्ताप्यांचा पांजरापोळ" या सदरा खालीं अनेक आत्मचरित्रें ग्रथित करण्याच्या प्रयत्नांतला पहिला भाग आज वाचकां पुढें मांडला आहे. ह्या प्रयत्नाचा हेतु भारी शुद्ध व अति सात्विक असा आहे इत्यादि स्पष्ट लिहून सांगण्याची गरज नाहीं. कारण, वाचनानें आपोआप तो व्यक्त होतच आहे. व्यक्तीचे किंवा समूहाचे उपमर्द, अपमान, दुर्लौकिक इत्यादि कोणत्याही वाईट हेतूनें असे प्रयत्न करण्यास उद्युक्त होणें या लेखकाचें शील नाहीं. समूह किंवा व्यक्ति यांच्या अब्रुवर हल्ला करण्यांत पुरुषार्थ कांहीं एक नसतो व त्यापासून कोणाचेंच कदापि कल्याण होणें शक्य नाहीं. पोटीं अनुताप उपजावा; पश्चात्तापानें अंतःकरण पोळून शुद्धाचरणाकडे प्रवृत्ति व्हावी; ईश्वराची भीति वाटून संसारांतली क्षणभंगुरता ध्यानांत यावी; व आपल्या कर्माप्रमाणें फळें भोगणें कधीं कोणास चुकत नाहीं हें तत्व मनावर चांगलें ठसावें या एवढ्याच हेतूंच्या साध्यतेसाठीं हीं कांहीं उदाहरणें पुढें मांडिलीं आहेत. विवक्षित व्यक्ति यांत तर एकही नाहीं. किंवा अमुक एका प्रसंगाला अनुलक्षून व्यक्ति अगर समूह यांच्यावर वाक्प्रहारासाठीं घडलेली व खरीखुरी गोष्ट उपरोधिकपणानें लिहिली असेंही नव्हे. उदाहरणें घेतलीं आहेत

त्याचा हेतु उपदेशाला साधन व्हावें या पलीकडे कांहीं नाहीं. उदाहरणाच्या योगानें गोष्ट मनांत ठसते तशी अन्य-रीतीनें ठसत नाहीं. या साठीं उदाहरणें निवडून काढावीं लागतात. हीं उदाहरणें घेण्यांत व्यक्तीचा उपमर्द, व्य-क्तीची बेअब्रु किंवा समूहाचें बदनाम करण्याची काडी इतकीहि इच्छा नाहीं ! सरकार, त्यांचें खातें किंवा त्यांचे नौकर, यांच्या संबंधीं वाईट ग्रह करण्याचा प्रयत्न अगर त्यांना कमीपणा येईल अशी वासना या लेखकाचे अंतःकरणासही शिवलेली नाहीं. उदाहरण द्वारा उपदेश आणि कळकळीच्या पोटीं हितबोध हें पवित्र कर्तव्य बजावण्या पलिकडे कोणताच अन्य हेतु या प्रयत्नांत नाहीं हें निःसंदेह समजून पुढील गोष्ट वाचण्यास उद्युक्त व्हावें, एवढीच वाचकांस विनंति आहे.

विजया दशमी शके १८२५. धनुर्धारी.

पश्चात्ताप्यांचा पांजरपोळ.

प्रकरण १ लें.

अनुसंधान.

बऱ्याच वर्षांपूर्वीं एका क्षेत्राला मी गेलों होतों. तें क्षेत्र मोंगलाईतलें. तेथें दोन नद्यांचा संगम असून त्या क्षेत्राची महाराष्ट्र देशांत भारी ख्याती आहे. सर्व क्षेत्र पाहून झाल्या नंतर मी एका स्वामीच्या दर्शनास गेलों. पूर्वाश्रमी स्वामी कारकुनीपेशाचे होते. चतुर्थाश्रम घेतल्यानंतर त्यांनीं आपला कालक्षेप उत्तम तऱ्हेनें चालविला. व स्वामी वृद्धही बरेच झालेले. तेव्हां, त्यांना भेटून कांहीं उपदेशामृताचा लाभ होतो कीं काय पहावा, अशी इच्छा साहजिकपणें मला उत्पन्न झाली. स्वामी संगमावर बसलेले होते व वृत्तीही आनंदी पाहून मी त्यांच्या पुढें साष्टांग नमस्कार घातला. नारायण नामस्मरणपूर्वक आशीर्वाद देत स्वामींनीं मला उठावयास सांगितलें. मी पुढें हात जोडून बसलों. स्वामींनीं प्रश्न केला "काय इच्छा आहे?" मी सांगितलें "या संसारअरण्यांत मी भटकत फिरत आहें, वाट कांहीं सांपडत नाहीं. जिवाला चैन पडत नाहीं. चित्ताला आनंद व शांती मिळेना. सदा सारखी तळमळ लागलेली असते. आत्म्याकडे माझें दुर्लक्ष्य फार होत चाललें आहे. त्याची कांहींच पर्वा बाळगली जात नाहीं. कर्तव्य

माझें काय व तें करावें कसें याचा उमजच आवीं पडेना. 'काय करावें'? हा पहिला प्रश्न आहे. दुसरी चिंता, धर्माची ओळख आमच्या तरुण पिढीला कमी; आहे ती बुजत चाललेली. तेव्हां ती कांहींतरी सोय होते कीं काय पहावें? स्वतःची गोष्ट पहिल्यानें. त्यानंतर ही दुसरी दुसऱ्या साठीं." माझें बोलणें इतक्यावरच थांबवून स्वामी ह्मणाले "कांहीं चिंता नाहीं. अनुताप होई तोंपर्यंत मला कांहींएक सांगतां येत नाहीं व करणें शक्य नव्हे. शिवाय सांगण्याचा परिणाम व्हावयाचा नाहीं. गुरुवाक्यावर निष्ठा असेल तर सर्व कांहीं साध्य आहे. अनुताप प्राप्त होई तों पर्यंत जगाच्या रहाटी प्रमाणें वागत जा. अविश्वासाचें रान फार माजलेलें आहे. निष्ठा रुजण्याला अद्याप अवकाश बहुत आहे." इत्यादि 'वेदांत' त्यांनीं सुरू केला तो कांहीं मला रुचेना. तो थांबविण्यासाठीं मध्येंच मी प्रश्न केला:— "या क्षेत्रांत इतके सेवेकरी आहेत. फुकट काळाचा अपव्यय त्यांनीं चालविला आहे. आमच्या देशांत दीड दोन कोटि पेक्षां कमी नाहींत इतके साधु, संत, बैरागी, इत्यादि अनेक नामानें फुकट खात बसले आहेत. या दीड कोटि लोकांना जेवण्याला खर्च दरमहा सहा एक कोटि रुपये, ह्मणजे, सालिना बाहत्तर कोटि रुपये येतो. ही बाब नुस्ती खर्चाची. त्यांनीं उद्योग केला तर माणशीं चार रुपयाची तरी भर पडेल. ह्मणजे, सहा कोटि रुपये दरमहा ते झाले, सालिना पंचाहत्तर; मिळून सुमारें दीडशें कोटि रुपयांचें

दरसाल नुकसान होत आहे. खुद्द हिंदुस्थानचें दरसाल उत्पन्न अवघें शंभर कोटींचें. आमच्या साधु-संतांनीं हिंदुस्थान सरकारापेक्षां हा एवढा मोठा खजीना दरसाल फन्ना पाडण्याचा तडाखा चालविला आहे. तेव्हां, ही मंडळी व्यवस्थितपणानें काम करील तर मोठें कार्य होणार आहे.''
हे माझें भाषण स्वामींना रुचलें नाहीं. तें माझें भाषण ऐकून तिरस्कार दर्शक असे ते नुस्ते हंसले. ''भली फडणिशी ! '' असेंही त्यांनीं ह्मटलें. '' आमच्या क्षेत्रांत सेवेकरी आहेत हे सर्व जगांतल्या कारभाराला नालायख अशांपैकींच. त्यांना नुस्तें तुह्मां गृहस्थांनीं पोसले पाहिजे. त्यांच्या हातून आजवर कांहीं काम झालेलें नाहीं व पुढेंही कांहीं करण्याची त्यांच्या अंगीं पात्रता आहे असें लक्षण दिसत नाहीं. ''

मीः—आयतें फुकट खावयाला मिळतें मग कोण कशाला आपल्या शरीराला झिजवीत काम करण्याला तयार होणार आहे ?

स्वामीः—तसें नव्हे. त्यांच्या अंगीं कुवतच मुळीं नाहीं. दुःखानें पोळलेले, संकटानें गांजलेले, व्याधीनें त्रस्त झालेले, पश्चात्तापानें होरपळलेले व प्राणाचें ओझें कसेंतरी वहात कालक्रमणा करण्यांत गुंतलेले हे तुमच्या जगाच्या बाजारांत काय उपयोगाचे ? मनाचें दुःख व प्राणाचें संकट यांच्या जाचांतून घटकाभर तरी मनाला विश्रांती मिळावी ह्मणून गांजा फूंक, नाहींतर अफू चघळ, अशा खालीं

आपलें आयुष्य घालवीत, देव देव करण्याच्या ढंगानें घांस भर अन्न तरी त्यांच्या पोटांत जातें. ' करून करून भागले आणि मग देवाच्या नादीं लागले ' त्यांपैकीं हे. ते काय जगांतल्या टक्याटोणप्याच्या माऱ्यांत निभावणार आहेत? कां कांहीं काम करण्याला त्यांच्यांत ईर्षा उरली आहे? कां हिम्मत त्यांच्यापाशीं शिल्लक ? कां, आहे तरी काय ? आणि अशांच्या हातून कां कांहीं होणार ? इत्यादि स्वामींनीं मोठ्या आवेशानें भाषण चालविलें, तें मी मुकाट्यानें ऐकत बसलों. या लोकांना असे ऐदी बसून खावयाला तरी आह्मीं काय ह्मणून घालावें ? हा मीं प्रश्न केला. त्याला स्वामींनीं भारी समर्पक उत्तर दिलें. त्यांचा कोटिक्रम मला भारी आवडला. भूतदया आणि परोपकार यांच्या चाकांवर अव्यवस्थितपणानें हें गाडें असें चालावयाचेंच. ईश्वराला तरी अशांचा संभाळ केलाच पाहिजे. तें ईश्वराचें काम कसें बसें अळेंबळें तुह्मां सारख्यांच्या हातून घडत आहे. तुह्मीं आपखुशीनें व कर्तव्यपुरःसर करीत आहां थोडेंच. या जगांतले व्यवहार सारे अंधपंगु न्यायानें चालले आहेत व चालले पाहिजेत. तुह्मीं या संतांनीं अमुक करावें, तमुक झालें पाहिजे, ह्मणून फडणिशी हिसाब सांगण्याला सिद्ध झालां; पण तुह्मीं प्रापंचिकांनीं काय चालविलें आहे याचा कधीं आढावा काढिला आहे काय ? सारा प्रकार आंधळें दळतें, कुत्रें पीठ खातें, अशांतला चालला आहे. दुसऱ्याला सांगण्याला गोष्टी सोप्या, तितक्या स्वतः

करण्याला नसतात. चाललें आहे तें सर्व ठीक आहे. भिक्षेकरी, साधुसंत, बैरागी इत्यादि लोक फुकट खाऊ, ऐदी, व्यसनी, खायाला काळ, इत्यादि प्रकारची हांकाटी गृहस्थमंडळींनीं माजवावी यांत नवल नाहीं. आणि धर्माच्या व देवाच्या नांवानें व नानातऱ्हेच्या वेषानें जगांतील धर्मबुद्धीचा व भूतदयेचा यांनीं असा फाजील दुरुपयोग करावा हेंही नीट नव्हे. तें शुद्ध पाप आहे. परंतु याची कांहीं तरी तजवीज केली पाहिजे. तड-जोड काढावयाला हवी. नरहरदेवाची ही अशी पालखी फार दिवस चालावयाची नाहीं. आह्मीं काय, संन्यासी ! सर्व संग परित्याग करून आपल्या एकट्याच्या जन्माची सोय लावण्यांत गुंतलेले. स्वतःच्या उद्धाराचा मार्ग पत्करून स्वतः तरून जाण्याची तेवढी सोय अष्टोप्रहर पाहत बसणें ही स्वार्थबुद्धीची शुद्ध कमाल होय. हेंही आह्मांला कळतें. परार्थतेच्या गांवींही आणि स्वप्नांत सुद्धां जाणारे आह्मीं नहोंत असें तुह्मी ह्मणाल तर तें साफ खोटें ह्मणून सांगण्याला आह्मांला कठीण जातें. परंतु आह्मीं आमचें सर्वस्व, देह, इंद्रियें, मन, आत्मा, ईश्वरी इच्छेच्या स्वाधीन करीत, त्याच्या प्रेरणेवर सर्व सोंपवून बसण्याच्या यत्नांत आहोंत. जगाची काळजी आह्मांला आहे. जगाचीं संकटें, जगांतलीं दुःखें पाहून आमचें अंतःकरण तिळतिळ तुटतें. आह्मीं दगड नव्होंत. आह्मीं पशू नव्होंत. परंतु कर्तव्यसीमा एकदां आह्मीं ठरवून सोडिली आहे.

प्रत्यक्ष व्यवहाराचा आह्मांला वीट आलेला आहे. जगांतील कारभाराचा तिटकारा पूर्णपणें आमच्या शरीरांत बाणलेला. या अविनाशी जगांतली मिथ्यता व चंचलता आमच्या अंतःकरणांत भिनून गेली आहे. एकंदर आशेचा संपूर्ण अंकूर जळून फस्त झाला ह्मणजेच मनुष्य जिवावर उदार होऊन आत्महत्येला प्रवृत्त होतो, त्याच प्रमाणें या जगांतला अशाश्वतपणा आणि हें जग शुद्ध मिथ्या अशी मनाची बालंबाल खात्री झाल्यानें अनुतापाचा भडाग्नी पेटल्यानंतर या जगताचा व त्यांतील कारभाराचा त्याग करून संन्यासवृत्ती धरण्यास आह्मी प्रवृत्त होतों. या जगाचा व त्या जगांतील व्यापाराचा असा तिटकारा आल्यानंतर त्या जगांतल्या कारभाराकडे आमचें लक्ष जाईल कसें? व गेल्यानंतर तें टिकणार कोठून? जी गोष्ट अजीबात मिथ्या तिच्या नादीं लागणें शक्य नव्हे! या जगाकडे ढुंकून पाहूं सुद्धां नये अशी घडोघडी मनाची प्रवृत्ती होते व त्या जगाच्या उलाढालींत मन गुंततही नाहीं, ह्मणूनच आह्मी असे अलिप्त राहतों. देह आहे, मन आहे. जरा तें हालचाल करितात, त्या हालचाली बंद करून त्यांच्या नाकांत अडकविलेलीं वेसणें ओढावी असे प्रसंग आह्माला वारंवार येतात" इत्यादि मोठे शांत व विचारपरिप्लुत स्वामीनीं संभाषण चालविलें, तें ऐकण्यांत मी दंग झालों होतों, तों इतक्यांत, एक सेवेकरी किंवा स्वामीचा शिष्य आला. त्याला दाखवून स्वामी ह्मणाले, हे तुह्मांस चांगले

समजावून सांगतील. त्यांनीं जगाचा अनुभव पुष्कळ घेतला आहे. त्यांना विचारा. नुस्त्या एवढ्या परिचयावर एकदम उभयतांच्या भाषणाचा प्रारंभ व्हावा इतका अधिक प्रसंगीं मी नव्हे व तितका उत्सुक तो प्राणीही नव्हता. आमचें चाल-लेलें भाषण मात्र मध्येंच असें थबकलें या संबंधानें माझा मोठा हिरमोड झाला. तथापि त्या गृहस्थामुळें पुष्कळ उपयोग पुढें झाला हें मात्र खरें. प्रारंभींच तो गृहस्थ कांहीं फारसा बोलेना. एके दिवशीं संध्याकाळीं मी त्याला एकांतीं गांठलें. उभयतांचीं बोलणीं मोठीं उपयुक्त अशीं झालीं. मात्र मनुष्य भारी खोल मनाचा! जिभेबर त्याच्या निसरड अशी मुळींच नव्हती. या जगांत सुखाचा अनुभव घेऊं इच्छिणाऱ्यानें पहिली खबरदारी आपल्या जिभेची घ्यावयास पाहिजे. जीभ आणि तिचा उपयोग हा प्रपंचांत वावरणारांचा मोठा अवघड प्रश्न आहे. सुख दुःख किंवा कीर्ति अपकीर्ति अथवा राग लोभ यांचा उगम या जिभेच्या वावरण्यांत खास असतो, हें विचाराअंतीं कळून येतें. अंतःकरण झांकलेलें, गुप्त असें असतें. तें उघडें करून दाखविणें, त्या अंतःकरणांतल्या वृत्ती व्यक्त करणें हें काम एकट्या जिभेचें होय. अंतःकरण उघडें करण्याकडे जिभेचा उपयोग करावा हें रास्त, किंवा अंतःकरणाच्या वृत्ती दाबून ठेवण्याच्या कामीं जिभेचें सहाय्य घ्यावें हें बरें, हा मोठा गूढ असा प्रश्न आहे व त्या संबं-धानें मतभेद पुष्कळच दिसतो. मनुष्याची किम्मत खरी कायती त्याच्या जिभेवर करण्याचा सांप्रदाय आहे.

"वाचेचा रसाळ" मनुष्य पुष्कळांना आवडतो. वाचेचा फटकळ माणूस, त्याचा प्रत्येकाला तिटकारा येतो, असा अनुभव आहे. जग वश करण्याचें एक सोपें सहज साधन ही जीभ होय. जगांतील राष्ट्रेंच्याराष्ट्रें पालथीं उलथीं या "जिभला बाईच्या" प्रतापावर झालेलीं आहेत. असा पराक्रम या जिभेचा किती तरी गाण्यासारखा आहे ! जास्त पाल्हाळ करण्यांत अर्थ नाहीं. परंतु या सर्वांचें एकच प्रमेय तें हें कीं, जिभेवर सत्ता ठेवण्याच्या कामीं कुशलता या जगांत मोठमोठीं कामें पार पाडण्याचें सोपें साधन होय. स्वामींनीं गांठ घालून दिलेला माणूस आपल्या जिभेला अगदीं आपल्या कह्यांत ठेवण्याच्या कामीं पटाईत वाटला. बोलावें थोडें व ऐकावें फार अशी ईश्वरी इच्छा दिसते, कारण, देवानें कान दिले आहेत दोन, तोंड मात्र एकच, हा कोटिक्रम बराच सत्य आहे. माझे हे नूतन परिचित या मार्गांतले. त्यामुळें मला प्रारंभीं त्यांचा तिटकारा आला. धड बोलत नाहीं किंवा पूर्ण मोकळ्या मनानें बोलण्याची ज्याला आवड नाहीं अशा मनुष्याची गांठ सुखदायक व्हावी कशी ? स्वामींनीं ओळख करून दिलेल्या या " भक्ता " संबंधीं मला पुष्कळ तिटकारा आला व कंटाळून त्याचा मी नाद सोडण्याचा संकल्पही केला. क्षेत्रांतील सर्व पहाण्याजोगीं स्थळें इत्यादि आटोपून व स्वामींचें आणखी एकदां दर्शन घेऊन घरीं परत जाण्याची मी तयारी केली. दुसरे दिवशीं संध्याकाळीं निघण्याचा माझा निश्चय ठरला. सकाळीं

आपला सर्व विधी आटोपून माझे नवीन परिचित "मित्र" माझ्या बिऱ्हाडीं आले. " चला आपण संगमावर जाऊं, मला चार गोष्टी बोलावयाच्या आहेत. तुह्मी आतां चाललां, पुनः आपल्या गांठी केव्हां पडतील याचा नेम कोणी सांगावा ? " त्याच्या विनंतीला मान देऊन मी संगमावर जाण्याला सिद्ध झालों. मी कोण काय याची सर्व माहिती या परिचित भक्तानें या तीन दिवसांत मिळविली असें मला मात्र आढळून आलें. ती माहिती पूर्णपणें मिळे तोंपर्यंत हा मजशीं मुग्ध होता हें मला कळलें. भक्तपणा पत्करिलल्याच्या धूर्ततेचें आश्चर्य मला वाटलें. असो; माझ्या परिचितानें एकदम भाषणास सुरुवात करून ह्मटलें "तुह्मीं येथें केवळ क्षेत्रदर्शनाच्या हेतूनें आला नाहीं. तुह्मांस स्वजन कल्याणाच्या उपायांच्या चिंतनिकेचा निदिध्यास लागला आहे असें मला वाटतें. या क्षेत्रांतील सेवेकऱ्यांच्या हातून कांहीं धर्मसेवा घडावी हीं इच्छा तुमची दिसते. धर्माच्या उध्दारा संबंधीं खटपट आह्मीं करावी असें तुमच्या मनांत आहे. आपल्या धर्माची उपेक्षा चालली आहे ती पाहून तुह्मांस वाईट वाटत आहे. आपल्या धर्माची जाग्रती सर्वत्र चांगली असावी या इच्छेला अनुरूप असें कांहीं सहाय्य या क्षेत्रांत मिळेल कीं काय ह्मणून तुह्मीं शोध चालविला ही गोष्ट मला कळली आहे; परंतु तुमच्या मना जोगतें कांहीं येथें घडेल असें वाटत नाहीं. तथापि तुमच्या हेतूंप्रमाणें कांहीं थोडें बहूत तरी घडुन येईल." इकडल्या तिकडल्या

लांबलचक गोष्टी सांगून मी तुमची वेळ घेत नाहीं. मी इंग्रजसरकारची नौकरी पुष्कळ वर्षे केली आहे. मोठमोठ्या जबाबदारीचीं कामें माझ्या हातून घडलीं आहेत. माझ्या कृतकर्मांचा मला मोठा पश्चात्ताप झाला; तेव्हां नौकरी सोडून मी येथें येऊन बसलों. येथें माझ्या देखत पुष्कळजण सेवेस येऊन राहिलेले मी पाहिले आहेत. पश्चात्ताप झालेला मी आहे, तसेच आणखी कोणी आहेत कीं काय ? किंवा, मी एकटाच हा असा पापी ? अशी सदां मनाला रुखरुख लागलेली असते. शिवाय माझा बहुतेक जन्म लोकांचीं गुप्त कृत्यें उघडकीस आणण्याच्या कामांतच गेला. इंग्रजसरकारच्या पोलीस खात्यांत मीं नौकरी केली व गुप्त पोलीसचें कामही बरेच दिवस मी करीत होतों, त्यामुळें मी येथें "सेवा" करण्यासाठीं आलों तरी माझी जन्मखोड कांहीं गेली नाहीं. स्वामीपाशीं मी अगदीं मोकळ्या मनानें सर्व सांगितलें आहे. ईश्वरानें माझ्या प्रपंचावर वरवंटा चांगलाच फिरविला, त्यामुळें मला या जगांत आतां कांहीं एक उरलेलें आहे असें वाटत नाहीं. पश्चात्ताप पावून तूं एका नीट मार्गास लागला आहेस त्याप्रमाणें आणखीं कांहींजणाला या मार्गाला लावण्याची खटपट कर म्हणजे तुझ्या हातून कांहीं पारमार्थिक काम घडल्या सारखें होईल असें मला स्वामींनीं अनेक वेळां सांगितलें. जगांत उपदेश करण्याचा अधिकार माझा नव्हे व तितकी माझी पात्रता नाहीं, हें माझें मला कळतें. मी

लोकांना उपदेश करण्याच्या योग्यतेचा नव्हे असें माझें मलाच वाटतें. परंतु माझ्या प्रमाणें इतर पातकी आहेत त्यांनीं लौकर शुध्दीवर येऊन पश्चात्तापानें आपण शुद्ध व्हावें व या मानव जन्माचें सार्थक करून घ्यावें अशी माझी फार इच्छा आहे. दुसऱ्याचें ऐकून व पाहून मनाला बोध होतो तो कांहीं नुसत्या सांगण्यानें व्हावयाचा नाहीं याकरितां मी अनेक पातकी मंडळीच्या " जबान्या " घेऊन ठेविल्या आहेत. त्या सर्व आपखुशीनें दिलेल्या जबान्या. त्या तुमच्या स्वाधीन करितों. त्यांचा वाटेल तो व वाटेल तसा तुम्ही उपयोग करावा. त्या जबान्या जगाला वाचावयास मिळतील तर शंभरांतून एकाला तरी कृतकर्माचा पश्चात्ताप वेळींच होईल व तो पापाचें क्षालन करून सुखी होईल. प्रखर शासन मिळाल्या नंतर मला पश्चात्ताप झाला तसा इतरांस होऊं नये; प्रायश्चित मिळण्यापूर्वींच पश्चात्ताप झालेला बरा. यास्तव मी ही मिळविलेली माहिती तुमच्या स्वाधीन करितों. त्याचा उपयोग कांहीं होत असल्यास करा. नुसती लोकांची करमणूक होईल इतकेंच मला नको आहे. दुसऱ्याचा उत्कर्ष तो आपला अपकर्ष किंवा दुसऱ्याचें सुख पाहतांच आपणांस दुःख व्हावयाचें हा मत्सरी लोकांचा उपजत स्वभाव, त्याच प्रमाणें दुसऱ्यांची फजिती किंवा छीः थूः ही आपली करमणूक, अशा समजुतीचे लोक या जगांत थोडथोडके नाहींत. पुष्कळ भरलेले आहेत. लोकांची करमणूक व्हावी

एववढीच किंवा तीच एक माझी इच्छा नाहीं. बेहत्तर आहे करमणूक न झाली तर. परंतु बोध झाला पाहिजे. चांगला चक्क मनांत उजेड पडावा ही माझी खरीखरी इच्छा. ती पूर्ण कशी व्हावी हा मी पुष्कळ दिवस विचार करीत होतों. माझ्यानें तें काम शेवटास जाईना. तुमच्यानें झालें तर पहा. पापा पासून परावर्त होत पश्चात्तापानें जितके आपले बांधव शुध्द होतील तितका मला आनंदच आहे. " आप तरुनिया दुजासि तारी " तोच श्रेष्ठ मानतात. इत्यादि अनेक तऱ्हेच्या या परिचितानें मला गोष्टी सांगितल्या. त्या सगळ्या सांगण्यांत अर्थ नाहीं. आह्मीं दोघेजण संगमावर गेलों. तेथें एक गवती झोंपडें होतें. त्यांत तो सेवेकरी रहात होता. त्यानें एका दप्तरांतून कांहीं काढून मला वाचून पहा ह्मणून सांगितलें. मी येथें कांहीं आतां वाचीत नाहीं. दोन प्रहरीं निवांत वेळीं वाचून पाहतां असें सांगितलें; पण तें त्याला रुचलें नाहीं. तेथल्या तेथं मी वाचून त्या संबंधीं आपलं मत द्यावें अशी त्याची इच्छा असल्याचें स्पष्ट दिसलें. मीं ह्मटलें "चला एथली सेवेकरी मंडळी तरी पाहूं" आणि त्याप्रमाणें आह्मीं दोघेजणांनीं सेवेकरी मंडळीस पहात दोन तीन तास घालविले. नंतर घरीं येऊन जेवण खाण केल्यानंतर स्वामींचा निरोप घ्यावयास गेलों. स्वामींनीं फारच उत्तम उपदेशामृताचे पेल्या मागून पेले प्राशन करण्यास दिले. तो सर्व उपदेश सदां सर्वकाळ मनांत कायम राहील तर मोठ्या सुदैवाची जोड

मिळाली असें होईल ह्मणून त्याच वेळीं मला वाटलें. स्वामींनीं स्वकर्तव्य व तें कां व कसें बजावावें या संबंधानें पुष्कळ सांगितलें. नंतर, "येथली सर्व सेवेकरी मंडळी पाहिली तना?" असा स्वामींनीं प्रश्न केला. मी त्यांना ह्मटलें "होय; अगदीं निराश झालों मात्र" "निराश होऊं नका. आशा कायम राहील असेंच करा व वागा." इतक्यांत आमचे नवीन परिचित आले. मी दिलेले कागद वाचून पाहिलेत काय? असा पहिला प्रश्न केला. "होय अथून मधून वाचले. चांगले आहेत, त्यांचा उपयोग खास करितों." असें मी उत्तर दिलें. "येथली सेवेकरी मंडळीही सर्व यांना मुद्दाम भेटविली." असें स्वामीला परिचितांनीं सांगितलें. "हा शुद्ध माणसांचा पांजरपोळ" आहे असें मी ह्मणालों व स्वामींनीं हंसून उत्तर केलें. "खरें आहे, पापी माणसांचा पांजरपोळ" असें कां ह्मणाना? ह्मणून परिचितांनीं उद्गार काढिला. स्वामी ह्मणाले, "पाप्यांचा" असें कशाला म्हणावें? मी ह्मटलें "पश्चात्ताप्यांचा पांजरपोळ" ह्मणावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं. तें स्वामीला मान्य झालें.

ह्मणजे, परिचित मित्रानें दिलेल्या "आपखुशीच्या जबान्या," कित्येक सेवेकऱ्यांची कळलेली हकीकत व परिचितांच्या तोंडून कांहीं ऐकिलेल्या गोष्टी आणि बराचसा स्वानुभव, इतक्या सामुग्रीवर हा कथाभाग लिहीला आहे. याच्या पेक्षां जास्त येथें सांगणें अवश्यक वाटत नाहीं.

प्रकरण २ रें.

कसाबी कसबें:-पोलीसचा पश्चात्ताप.

सुमारें सतरा अठरा वर्षांची माझी उमर झाली. घरांत खातीं तोंडें तीन चार. विधवा आई, धाकटाभाऊ, लग्ना-ची एक बहीण. घरची "इष्टेट" भाड्यानें फार दिवस राहिलेल्या दोन तीन खोल्या; फुटकीं तुटकीं १५।२० भांडीं; फाटकीं दहापांच कपड्यांचीं बोचकीं; दीड दोनशें रुपये कर्ज. पाहिजे तर स्वयंपाकाला मोलानें जावें, वाटल्यास कोणाच्या घरीं भाकऱ्या भाजण्याची नौकरी पत्करावी, दळण कांडण करावें किंवा भिक्षा मागावी हा रस्ता माझ्या आईला मोकळा. माधुकरी मागावी, वाटल्यास वार लाऊन घ्यावेत, ही सोय माझी. आम्हीं दोघें पोटभरून जेवलों तर त्यांची सोय करावी, ही माझ्या बहिणीची आणि भावाची स्थिति. भिकारी, दरिद्री, स्वयंपाकी, माधुकऱ्या हे किताब आमच्या कुटुंबांतल्यांचे. कोठें गेलों तर आदर सत्कार नाहीं. या बसा नाहीं हा इतमाम. अशा स्थितीला मी कंटाळलों. तें वार लाऊन जेवणें नको, स्वयंपाकिणीचा मुलगा म्हणऊन घेणें नको, ती शाळाही पुरे आणि तें शिकणें ही बाजूला राहो, असें मला वाटलें. नरसोपंत वकील. त्यांच्या घरीं आई स्वयंपाकास राहिलेली. त्यांची

चहा बरीच होती. पैसे ही चांगले मिळत. एके दिवशीं असा सकाळीं उठून अप्पासाहेब (नरसोपंताचें नांव) वकील यांच्या घरीं गेलों. ते चहा पीत बसले होते. तेथें जाऊन नुसता उभा राहिलों. "केशा, कांरे आलास? अभ्यास नाहीं का करावयाचा?" असें खस्सदिशी अप्पा साहेब अंगावर आले. कांहीं एक मीं उत्तर दिलें नाहीं. तसाच उभा राहिलों. अप्पासाहेब माडीवर गेले. मी ही त्यांच्या बरोबर माडीवर गेलों. अप्पासाहेब खोलींत शिरले, मी खोलींत गेलों. तेथें कोणी नाहींत असें पाहून त्यांच्या पायांवर जाऊन डोकें ठेविलें व त्यांचे पाय घट्ट धरले. "केशवा ऊठ. काय तुला हवें तें सांग. काय, झालें काय तुला?" असें नरसोपंत ह्मणाले. माझ्या डोळ्यांत पाणी आलें. मला दुःख सहन झालें नाहीं. मी फक्त ह्मटलें "कोठेंतरी आणि कसली तरी नौकरी मला लाऊन द्या." "बरें आहे. करूं कांहीं तजवीज" असें नरसोपंताचें उत्तर मिळालें. मोठा धीर आला. "केशवा पोलीसा शिवाय तुला दुसरी कोणती ही नौकरी मिळणें कठिण दिसतें." मी ह्मटलें. "पोलीसची तर पोलिसची." "अक्षर, विद्या, परिक्षा यांच्यापेक्षां शरीराची उंची, छातीची रुंदी आणि गलेलठ्ठी याचीच किम्मत या खात्यांत जास्त. तेव्हां तुला नोकरी चटदिशीं त्याच खात्यांत मिळेल; परंतु आणखी चार अक्षरें अधीक शिकावींस; निदान एक तरी परिक्षा द्यावीस, असें मला वाटतें." हें अप्पासाहेबांचें

उत्तर ऐकून मी ह्मटलें "नाहीं, नौकरीशिवाय गत्यंतर नाहीं. मला पोलीशींत लाऊन द्या. तुमचे उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. नाहीं नौकरी मिळाली तर कोठें तरी हा चाललों तोंड काळें करून." असा माझा जबाब ऐकतांच अप्पासाहेब ह्मणाले, "बैस थोडा खालीं. आतां माझ्याकडे पोलीस जमादार कांहीं कामासाठीं येणार आहे. त्याच्याकडून तुझी सोय करवितों. काल पांच सहा पोलीस शिपायांना सक्त मजूरीची शिक्षा झाली आहे. चार पांच जागा अनायासें खालीं झाल्या आहेत. तुला लागेल नोकरी. जा काळजी करूं नको." हें अभिवचन ऐकतांच जणूं काय मला ती नौकरी मिळाली इतक्या खात्रीनें माझ्या अंतःकरणांत आनंदाचें भरतें आलें आणि मी आतां केव्हां जमादार साहेब येतात ती वाट पहात खालीं बसलों. तास दीड तास झाला. जमादार कांहीं येतना. इतक्यांत एकदांचे ते आले. मला वाटलें, झालों मी पोलिसांत नौकर आणि सुरू झाला माझ्या मनोराज्यांतला कारभार. उद्यां हजाम आला कीं हे केंस आतां असे राखावयाचे; पोषाख, डगला, टोपी, विजार, वाहणा, तर सरकारांतून मिळतातच. झालें, मग काय? या मिशा अद्याप मला मोठ्याशा आल्या नाहींत. नाहींतर अस्सें पीळदार करून ठेऊन दिले असते, इत्यादि विचार मी करीत आहें, इतक्यांत अप्पासाहेबांनीं मला वर ये ह्मणून हाक मारिली. असा तीरासारखा टणटण उड्या

मारीत जिन्यांतून मी माडीवर गेलों. " केशवा, आज दोन-प्रहरीं जमादार साहेबांकडे कचेरींत जा. तुला कान्स्टेबलाची जागा उद्यांपासून ते देववतील." हीं वाक्यें ऐकून माझा आनंद गगनांत मावेनासा झाला. काय ती त्या वेळची मनाची स्थिति! चांगली, उत्तम मला आठवते.

कान्स्टेबल साहेब, पोलीस शिपाई, बकल नंबर ९ १ ४ १ हा माझा हुद्दा. इंग्रजसरकार बहाद्दरांचा मी नौकर. मेहेरबान खुदावंद पोलिस सुपरिंटेंडेंट साहेब बहादुर, जिल्हा— हे माझे हुजूर. अज्जम महिपतराव तुरमुंडे, सेकंड क्लास हेड कान्स्टेबल यांच्या दिमतीस माझी योजना. अज्जम सुरतखां वल्लद कमालखां, फर्स्ट क्लास, फर्स्ट ग्रेट, चीफ कान्स्टेबल साहेब फौजदार हे माझे अंमलदार झाले. मला स्वर्ग नुस्ता दोनच बोटें उरला. परमेश्वराच्या खालोखाल, किंबहुना हात दोन हात जास्तच; शाहणा काय तो मी आणि बाकी जग सारें तुच्छ असा भ्रम माझ्या डोक्यांत भरला. हा माझ्या नौकरीचा आरंभ.

शिकारीची सुरुवात.

एक महिना भरला. रुपये सात कोरे करकरीत हातांत पगाराचे पडले. दीड रुपया, पेढे वाटण्यासाठीं, सोबत्यांनीं कचेरींतल्या कचेरींत घेतला. घरीं आईनें नवस केला होता तो फेडण्याला तीन रुपये खर्च आला. भावाला आंगरखा, टोपी, बहिणीला परकर चोळी करण्याला अडीच रुपये

लागले. आईचा पगार चार रुपये. ते घरांत सामान सुमान आणण्या साठीं घेतले. महिन्याची बेगमी करण्यासाठीं बाजारांत गेलों. वाण्यानें अकरा रुपयांचा माल उधार दिला. त्याला दोन रुपये देऊं लागलों. तो घेईना, सावकाश द्या ह्मणाला. अंगांतल्या काळ्या डगल्याचा प्रताप! आईला स्वयंपाकास जाऊं नको ह्मणून दरडावीत सांगितलें. ती ह्मणाली, "नाहीं, आणखी एक दोन महिने नौकरी करितें, तोंवर तूंही नौकरीवर कायम होशील. पगाराचे रुपये या महिन्याचे सारे संपले. दोन महिन्याचे शिल्लक रुपये पडूंद्या." मी ह्मटलें "मूर्ख आहेस. भिकारडी ती भिकारडी! कान्स्टेबलची आई लोकांच्या घरीं भाकऱ्या भाजते, शरमेची गोष्ट आहे! परवां सुप्रींटेंडेंड साहेब बहादुर आमच्या फौजदारा समोर ह्मणाले, हा कान्स्टेबल मोठा हुषार, तरतरीत आणि बांका दिसतो; याला आम्ही लौकरच जमादार करावयाला मागतों. आणखी आठ दिवसांनीं ओसाडपूरच्या ग्याटीवर माझी नेमणूक होणार व मी तिकडे जाणार, आणि तूं कशाच्या येथें भाकऱ्या भाजत बसतेस? संपले,ते दिवस गेले. आतां नका काळजी करूं. मी मिळवून आणतों तेवढें सांभाळा ह्मणजे पुरे. समजलां कीं नाहीं?" हें माझें भाषण आईनें अगदीं निमूटपणें ऐकिलें. न ऐकून करिते काय? कर्त्या मुलांचें ऐकणें आईला भागच पडतें. लगेच दुसरे दिवशीं घरीं स्वयंपाक आईनें केला. "केशवा, धन्यरे बाबा! आज तूं मिळवून आणलेला हा दाणा मला अमृतापेक्षां

गोड लागला. घरीं आज असते कीं नाहीं,—हें आईचें बोलणें ऐकून मी जास्त फुगावयाचा. पण फुगावयला जागाच उरली नव्हती. आतां फुगूंतरी मी किती, असें होऊन गेलें. आईनें विचारिलें " कायरे केशवा, पोलीशींत पैसे चांगले मिळतात ह्मणे आणि ते आतां तुला कधींरे मिळूं लागतील ? " मी ह्मटलें " अं:, पैसे काय कमी ? पण मला लौकर जमादार साहेब व्हावयाचं आहे. ह्मणून पैसे खाण्या बिण्या कडे लक्ष न ठेवितां आगोदर झपूझप् काम शिकून घेतों त्यांत सगळा वेळ जातो. इलाज नाहीं. " सहा सात दिवस गेले. घरीं दीड रुपया घेऊन आलों. पैसे ठेवायाला पेटी पाहिजे. आपला खजिना लोकांना कळता कामानये. बाजारांतून तीन रुपयांची आधीं पेटी आणिली. रस्त्यानें खेडेगांवचा गाडीवान परत चालला होता. त्याची गाडी अडकविली. आमच्या शिरस्तेदार साहेबांच्या मेहुणीच्या भाचीची मुलगी गांवीं जाणार, तिच्या साठीं गाडी वेंठीला धरावयाची होती. हुकूम तसा झालेला; तेव्हां ही गाडी मी अडविली. गाडीवान गाया वाया करूं लागला. माझ्या हातावर आठ आणे त्यानें ठेविलेन. मी "जा" ह्मणून त्याची गाडी सोडून दिली. पुढें पांच गाड्या परत चालल्या होत्या. त्या पांचीही अडकविल्या. आपसांत त्यांनीं तडजोड करून मला एक रुपाया दिला. एक गाडीवान शेवटीं धरिला. वेसण न घालतां गाडी कां आणिली ह्मणून एका गाडीवानाला अडविलें. त्यानें आठ आणे दिले. असे दोन रुपये मिळाले.

त्यांतले दोन आणे देवाला नारळ, कापूर, दक्षिणा इत्यादि करितां खर्चिले. एक आण्याचीं विड्याचीं पानें शिरस्तेदार साहेबांच्या घरीं पोंचविलीं. तीन पैशांचीं बोरें घेऊन फौजदार साहेबांच्या घरीं दिलीं. दोन पैशांचे चांगले कांदे घेऊन जमादार साहेबांकडे पोंचविले. हवालदाराला एक आण्याच्या विड्या दिल्या. एक पैसा आंधळ्याला धर्मादाय दिला. बाकीच्या पैशांचे ऊंस घरीं मुलांना खावयास घेऊन आलों. दीड रुपया पेटींत ठेविला.

बैल तुझा रोडका, नाकांत बैलाच्या वेसण नाहीं, चाक मोडकें आहे, असें कांहीं तरी कुलंगडे काढून चार आठ आणे रोज सहज मिळवित होतों. बाजारांत खरेदी भाजीपाल्याची स्वतः करावयाची. पैसा अधेला आधीं टाकावयाचा, आणि मग दुप्पट तिप्पट माल खुशाल उपटावयाचा हा क्रम चालूं ठेविला. मात्र देव आणि धर्मादाय याला कधीं कधींही अंतर पडूं दिलें नाहीं. हवालदार, जमादार, फौजदाराचा अडली (आर्डेली), फौजदार आणि साहेबांचे शिरस्तेदार, हे माझें जणूं देवपूजेचें पंचायतनच. त्यांचें रोज दर्शन घ्यावें, रिक्त हस्तानें त्यांच्या पुढें जावयाचें नाहीं, असा क्रम मीं नित्य ठेविला. त्याचा साक्षात्कार मला होई. दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या तारखेला माझी कायम नेमणूक आठ रुपये पगारावर झाली. खागांवच्या घ्याटीवर मला पाठविलें.

पंचनाम्याला तूं चल, असें कोणा संभाविताच्या घरीं जाऊन बोलवणें करावें. आलेंच पाहिजे असें धरणें घ्यावें, कीं

खिशांत टाकावयाला रुपया, नाहीं तर अधेली, किमानपक्ष पावली, हटकून मिळावयाचीच. बिगार, वेठ, पंचनामे, साक्षीदार, पाटील, गाडीवान, असल्या कामांत मला पहिल्या चार महिन्यांत एकंदर रुपये दीडशें रोख मिळाले. आणिही बारिक सारीक अवदानें सारीं मला पचलीं. आतां रुपये हे इतके सांचले याचें काय करावें? हा प्रश्न मला सुचूं लागला. सोनें घेतलें तर तें लोकांना दिसतें. कर्ज फेडावें तर तें कळतें. एकतीस रुपये पगार चार महिन्यांत आला आणि दीडशें रुपये कर्ज फेडलें कसें? त्याचा पुरावा तयार होतो. हें कांहीं बरें नाहीं. खाणें पिणें फुकट व चमचमीत चाललेंच होतें. कर्ज तर फेडावयाचें. रोख रुपये द्यायचे नाहींत. कसें करावें हा प्रश्न घोळूं लागला. कर्ज देणारा सावकार कोरेगांव गावांत रहात होता. सावकारच तो. त्याच्या लांड्या लबाड्या कांहीं कमी नसावयाच्या. तेव्हां कर्ज फेडण्याच्या तजविजीस लागावें म्हणजे ती एक कमाईच समजण्याला हरकत नाहीं हा विचार केला.

एक पंथ दो काज. कर्ज फेडलें व रुपये जुळविलीं.

मी विद्या संपादन केली नाहीं. माझें घराणें मोठें नामांकित किंवा कुलीन नव्हे. वडील धारे किंवा सांगणारे कोणी मला नव्हते. माझा मी उपजत काय तो शाहणा. धाक कोणाचा नाहीं. आणि नातें गोतेंही फारसें नाहीं. संबंध लोकांशीं जितक्यास तितका. या परिस्थितीनें राहणें म्हणजे फारच वाईट. मला ईश्वरानें एवढा मोठा चोवीस तासांचा

दिवस दिला होता. इतकीं माणसें शाहणीं, पोक्त, विद्वान, सद्‌गुणी, जगांत वावरणारी दृष्टी पुढें. पुस्तकें, शाळा मास्तर यांचा जिकडे तिकडे सुकाळ; पुराणें, कीर्तनें, देवळें, भजनें; कोठें कांहीं कमतरता नाहीं. पण माझा नित्यक्रम असाः– आज कोठें पैसे उपटावयास मिळतील, आज कोणाला, आपल्या जाळ्यांत पकडावें, आतां पैसे काढण्यासाठीं कोणाचा छल कसा करावा, हा विचार चाललेला. अधिकारी माझे; त्यांना खुष कसें करावें, त्यांची मर्जी संपादण्याला कोणते उपाय योजावेत ? हा एक निदिध्यास. बतावणी करणें, कपटी प्रयोगाचे मंत्र सुरूं ठेवणें; एकीकडे हांजीहांजीखोरी तर दुसरीकडे गुरगुरणें, शिव्या देणें, भेडसावणें; एकदां मन मोकळें करण्याचा आव तर दुसऱ्यानें मुग्धपणाची पराकाष्ठा; असलें सर्व परस्पर विरोधी वर्तन माझें चाललें ! आणि तें ही केव्हां, तर जगांत अगदीं पहिल्यानें पाऊल टाकून वावरण्यास सिद्ध होतांना ! असो.

कर्ज फेडण्याची एक युक्ति मी काढिली. आमच्या सावकारानें नुक्तेच कांहीं दागिने खरेदी केल्याची मला खबर लागली होती. कधीं आणि किती दागिने खरेदी केले याचा बारीक तपास काढिला. आणि एके दिवशीं भर दोन प्रहरीं अवचित मी त्याच्या गांवीं गेलों. तो खेडे गांवांत राहत होता. मी गेलों त्या वेळीं तो दोन प्रहरचें जेवण करून वामकुक्षी करीत होता. मी त्याच्या खोली पर्यंत थेट गेलों आणि म्हटलें, "दादा साहेब आहेतकां?" त्यांनीं मला "निजले आहेत. अर्ध्या तासानें उठतील. तोंवर बसा" असा

जबाब दिला. मी ह्मटलें “ फार निकडीचें काम आहे, त्यानां उठवा. आम्ही सरकारचीं नोकर माणसें; आह्मांला फुरसत कोठून असणार ? काम भारी जरूरीचें आहे.” तों इतक्यांत दादा साहेब उपळाईकर बाहेर उठून आले व मला पाहून ह्मणाले “या नाईकसाहेब, या, वर या. मोठा आनंद झाला. गोविंदरावाचा हा मुलगा हो, आपल्या गोविंदरावाचा. या, या. जेवण व्हावयाचें असेल अद्याप ?”

मी:- छे: जेवणबिवण सर्व आटोपून आलों आहें. घर माझें,मला फार दिवसांनीं भेटलें.पण—बरें, दादा साहेब जरा एकांती जाऊं.”

दादा—एकांती? काय बुवा एकांत तो ? बरें, चला. अहो तुह्मीं घरचेच, तुमच्याशीं एकांत काय आणि लोकांत काय ? बरें, चला.”

असें ह्मणून आह्मी दोघे ही एका खोलींत गेलों. मी ह्मटलें “ दादा साहेब, तुह्मी मला वडिलांच्या ठिकाणीं. तुमचा आमचा घरोबा किती ? पण काय करावें ? नोकरी सरकारची पडली. ताबेदारी पुढें इलाज नाहीं. तुह्मी वडीलच आहांत, काय करावें तें तुह्मीच सांगा. ”

दा०—काय ? आहे काय वर्तमान ?

मी०—काय सांगू दादा साहेब ? या नोकरीचा, त्यांतून या पोलिसच्या नौकरीचा, पेशा वाईटच. आई बाप, भाऊ बहीण, कश्शाची नौकरींत पर्वा ठेऊन चालत नाहीं. काय करावयाचें आहे ?

दा०—अरे, खरेंच, केशव, तुला पाहतांच मला मली

आठवण झाली. तुझ्या गोविंदरावानें एक सोन्याचं वळं तीस रुपायाला माझ्या जवळ गहाण ठेविलं होतन. रुपये आणून दिलेत सारे. व्याजाचे रुपये तेवढे पांच कीं सात राहिले होते. ते आणून देऊन घेऊन जातों ह्मणाला होता. पण, बिचारा--असा सिधा गरीब माणुस नाहीं पुनः मिळा-वयाचा ! तूं अनायासें आला आहेस. तें घेऊन जा तुझं आपलें तें सोन्याचं वळं. वाटलं तर दे व्याजाचे रुपये. नाहीं तर न दिलेस तरी चालेल. तूं काय, नुक्ता नौकरीस लागलेला; तुझ्या जवळ तरी कुठले इतक्यांत पैसे यावयाला आणि तूं काय दुसऱ्या तिसऱ्या सारखा कामगार? अजून बच्चा आहेस. पण नांव मात्र चांगलं मिळवूं लागलास ! मला मोठा संतोष वाटतो--बरं मग. ?

मी०--पण आतांच कांहीं ह्या जिनसांच्या आणि गहा-णाच्या हिसाबाची गोष्ट नको. तुमच्याकडे राहिलं काय आणि माझ्याकडे राहिलं काय? वडिलां मागें आतां तुह्मीच कीं नाहीं आह्माला वडील ? परंतु, दादा साहेब, सध्यां आपल्यावर येणारा प्रसंग एवढा पार पडला ह्मणजे झालं.

दा०--काय? प्रसंग माझ्यावर? काय तो प्रसंग?

मी०--प्रसंग कसला ? लुच्चे लोक कांहीं तरी कुभांडें रचीत सुटतात? कोणी सुखी चार पैसे मिळवून राहिला कीं त्यांना पाहवत नाहीं; दुसरें काय? आणि सरकार हें असें नाजूक! अब्रूच्या ताडकन् ठिकऱ्या उडावयाला कांहीं उशीर कां लागतो?

दा०—ह्मणजे! झालें काय ? आहे तरी प्रकरण काय, तें मला आधीं नीट समजावून सांग पाहूं ?

मी०—सांगतोंच आतां. सांगण्या साठीं तर इतका लांब, मुद्दाम असा उन्हाचा, कोणास न कळवितां, आलों. ग्याट सोडून यावयाचें ह्मणजे गैरच तें. आणि सरकारी कामें काय विचारतां? मी कुठ कुठ यांतला चकार शब्द बोलणार नाहीं। ह्मणून माझ्या गळ्याची शपथ वहा. मग मी सांगतों: नाहींत माझ्या नौकरीवर पाणी पडून सुपरिन्टेंडन्ट साहेबांची मर्जी आहे ती जावयाची. साहेबाच्या जिवावर मी कुण्णाची, फौजदाराची, इन्पेक्टराची सुद्धां बिलकुल पर्वा बाळगीत नाहीं.

दा०—काय ? तुला, आणि शपथ ? ही घे वाहतो शपथ; उगीच वेळ नको जास्त जावयाला ?

मी०—तुह्मीं कांहीं दागिने अलिकडे खरेदी बिक्री केले आहेत काय ?

दा०—मीं ? आणि दागिने ? छेः मुळींच नाहीं.

मी०—झालें तर ! मग कांहीं इतकी भीति नाहीं. घ्या ह्मणावें झाडा आणि करा जप्त आणि न्या वह्या !

दा०—ह्मणजे, झाडा कशाचा ? जप्ती कोणाची ? काय, ह्मणतोस तरी तूं काय ? मला नीट सांग तरी खरा ! शपथ वाहिली मग कां असें अर्धें अर्धें बोलतोस ?

मी०— दागिने तुह्मी मुळींच खरेदी केले नाहींतना मग कशाला डर ?

दा०—दागिने खरेदी मी नाहीं केले. पण परवा एक तो हा—घेतला आहे बुवा, नाहीं ह्मणावयाला.

मी०—काय घेतलात ? असें कांहीं तरी असावयाचेंच. बरें, आतां मीं काय करावें तें सांगा. माझ्या नौकरी कडे पहा ! मला तुमची भीड तोडवत नाहीं. आणि नौकरी तर बजाविली पाहिजे ! एकीकडे आड आणि दुसरीकडे विहीर असें झालें आहे. आतां काय करावें कळत नाहीं—बरें, तुमच्या किल्या, तुमच्या वह्या कोठें आहेत ? मला माझें कर्तव्यकर्म बजाविलें पाहिजे.

दा--ह्मणजे ? हे पहा, केशवराव ? तुह्मी मला माझ्या मुला सारखे. गोविंदरावानें दीडशें रुपये एन मुद्दल व आजवरचें व्याज इतकें देणें. कर्जे रोखा आहे. मुदत जाऊं लागली ह्मणून तात्या फिर्याद करावयाला निघाला. मी ह्मटलं, मुदत गेली तरी बेहत्तर, आपल्याला फिर्याद कांहीं कर्तव्य नाहीं. मी तो रोखा फाडून सुद्धां ठेविला, कारण तुह्मी आतां कर्ते सवर्ते झालां ! पैसे कोठें बुडतात ? घरांत ठेविल्या सारखे आहेत. दाखवूं कां तो तुला कागद ? मी फाडून ठेविला आहे. पाहिजे तर तुझ्या जवळ ठेव. भरपाई सावकाश करून दे. आज कांहीं त्याची घाई नाहीं; पण मला, तूं कां असा आलास आणि खरेदीचें काय?तें आधीं नीट सांग.

येणें प्रमाणें मी मांडलेला डाव साधला. दादा साहेबानें आपलीं सर्व अंडीं पिल्लीं मजजवळ भरवशानें सांगितलीं. मी त्याचा अंत पाहण्यासाठीं खडा टाकला, तो कांहीं त्या-

च्या सारख्या धूर्त व चाणाक्ष सावकाराच्या ध्यानांत आला नाहीं, ह्मणून, माझ्या हुषारीचें व कर्तबगारीचें माझें मलाच कौतुक वाटूंलागलें. गहाण ह्मटलेलें -तें खोटेंच—सोन्याचें वळें मी उपटून घेतलें. कर्ज रोखा फाडून मागाहून नवा करून देण्याची सबब लढवीत हातांत घेतला. सोबत्याला देण्या साठीं रुपये दहा व पुढचा खर्च करण्या करितां रुपये पन्नास इतक्या सरंजामानिशीं मी दादाच्या घरांतून बाहेर पडलों. आणि, जातांजातां पाठींत एक खुंटी मारून शिताफी लढविली ती निराळीच. येतांना वाटेंत एका परहद्दींतल्या कापडाच्या व्यापारी वाण्यास चोरीचा माल पळवून नेतोस अशा संशाया वरून, तुला अटकेंत ठेविले असें बजावून, त्याचीं दोन घोडीं ओझ्या सकट मीं आपल्या ग्यार्टाकडे वळवून आणिलीं. तीन दिवस तो व्यापारी ग्याटीवर अटकेंत होता. आमच्या आईनें त्याच्या जवळून दोन लुगडीं घेतलीं, तेव्हां तिनें मला सांगितलें "त्याला जाऊंदे;" मग त्याची सुटका झाली. या वेळीं माझ्या पेटींत तीन साडे तीनशें रुपये होते ते मी आईला पेटी उघडून दाखविले. तिनें पन्नास अशाच शिताफीनें मिळविले होते! आह्मा उभयतांचा आनंद गगनांत मावेना !

एके दिवशीं दादा, आमचे सावकार, माझ्या घरीं आले. त्यांची भाची चौदा वर्षांची झालेली. ती मला देण्याचें बोलणें त्यांनीं आईकडे लाविलें. मी सांगितलें, बहिणीचें लग्न झाल्या शिवाय मला माझें लग्न कर्तव्य नाहीं. दादाचा सां-

थीदार दुसऱ्या गांवीं खाऊन पिऊन सुखी "नाईक" होता. त्याच्या मुलाला माझी बहीण देण्याचें ते ठरवूं लागले. या दोन्ही लग्नांच्या मुळाशीं माझा काळा डगला ! मी कसा तरी जांवई झालों ह्मणजे मीं भीति घातलेलीं व त्यांनीं घशाखालीं उतरविलेलीं आवदानें पचतील हा त्यांचा भरंवसा. बापू नाईक त्यांचे साथीदार स्नेही, सराफ. त्यांचें व माझें नातें माझ्या बहिणीमुळें जुळलें तर तिकडूनही बरेंच, हा वाट दादाचा. दादा लग्नें दोन्ही जुळविण्याच्या पक्के नादीं गुंतले असें पाहतांच मी ह्मटलें " शंभर रुपये खर्चिले तर मला पंधा दिवसांत जमादारी मिळते." दादाला तें माझें ह्मणणें खरें वाटलें. सरकारी नौकर ह्मणजे आमच्या लोकांना स्वर्गांतले देव वाटतात. सरकारी नौकर नव्हे तो मनुष्यच नव्हे. मर्द नव्हे, शहाणा नव्हे, अक्कलवान नव्हे, योग्यतेचा नव्हे. अशी समजूत पुष्कळांची सर्वत्र आढळते. देवा खालोखाल मान या जगांत दुष्ट मनुष्याला—कीं, जो आपलें केव्हां, कसें व काय वाईट करील याचा इतबार येत नाहीं अशाला; त्याच्या नंतर सरकारी मनुष्याला व त्याच्या मागून धनिकाला देण्याचा सांप्रदाय आढळतो. ह्मणून सांगण्याचें तात्पर्य तें इतकेंच कीं जमादारी मिळविण्याच्या खटपटीसाठीं दरबार खर्चाकरितां ह्मणून मीं रुपये शंभर उपटले हें खरें. हे शंभर रुपये पाहिजे तर लांचेदाखल समजावेत; वाटल्यास मला मिळणाऱ्या लग्नांतील वरदक्षिणेचा विसार

समजावा किंवा उसणवार व बिनव्याजी समजावेत. मला सोइस्कर वाटलें तेंच मी समजलों.

पुढें ईश्वराच्या कृपेनें,पण मला त्यावेळीं वाटलें माझ्या स्वतःच्या कर्तबगारीवर, माझें स्वतःचें लग्न झालें. माझ्या बहिणीला उत्तम स्थळ मिळालें. दादा सावकाराच्या मनोदया प्रमाणें गोष्ट घडली. लग्न खर्चाचाही बोजा मजवर फारसा पडला नाहीं. धान्यधुन्य दरएक खेडेगांवच्या पाटलांकडून मागविलें. मागविलें ह्मणजे विकत नव्हे. मागितलें; ह्मणजे भिक्षा म्हणून नाहीं. हात जोडून माझ्या घरीं आणून त्यांनीं पोंचविलें. दुकानदार व सावकार यांनीं तूप व गूळ यांचा पुरवठा केला. कापडचोपड उधार विकत घेतलें. सोन्या चांदीला मात्र रोख रुपये द्यावे लागले. लांचाचे सांचलेले रुपये दागदागिने करण्यांत गेले. पांचशें रुपये मला हुंडा मिळाला व दीडशें रुपये हुंडा बहिणीसाठीं मला द्यावा लागला. अखेरीला मजजवळ शिल्लक मात्र कांहीं छदाम उरला नाहीं. कापड चोपड व दागदागिने एवढेंच काय तें उरलें. लग्न झाल्या नंतर विचार केला; आतां आपला प्रपंच वाढला. असें कानांत तुळसी पत्र घालून बसणें कांहीं इष्ट नव्हे. आयुष्य आपलें क्षणभंगूर; जगांत कसलाही भरंवसा नाहीं; चांदी सोनें एवढेंच काय तें खरें. लगेच पांच पंचवीस रुपये खर्च करून माझी हवालदारीवर कायम नेमणूक करून घेतली.

ठळक ठळक शिकारी मारिल्या त्यांची बयान.

१ " मढ्याच्या टाळूवरील लोणी चाटण्याला " पहिल्यानें प्रारंभ केला. पंचनामे, गाडीवान, बेगारी, भिकारी, हीं छाट छूट कामें सोडून दिलीं. आतां मी हवालदार झालों. हुद्देदारांत गणना ! किरकोळ पांच दहा रुपये खाणें मला हलके पणा वाटूं लागला. माझ्या ग्याटी खालीं गांवें असत, त्यांत कोणी मनुष्य मेला आणि तो चार पैसे बाळगून असला, त्याला निदान चार पैसे कर्ज मिळण्या सारखे असले कीं तो मुडदा अडकवावयाचा. त्याच्या दफनाला परवानगी द्यावयाची नाहीं. डाक्टराकडे मुडदा पाठविला पाहिजे, पंचनामा करावयाचा आहे, मुडदा पाहिला पाहिजे, हे ठरीव मंत्र उच्चारावयास सुरुवात केली कीं, पन्नास, पाउणशें, शंभरही व्यवहारदक्षिणा माझ्या पुढें हात जोडून यावयाचीच. पाटील कुळकर्णी व एखादा तीर्थोपाध्या यांच्या तोंडावर मात्र चार दोन तुकडे टाकून द्यावयाचे. त्या वर्षीं बारा मुडदे अडविले. आणि त्या बहादुरकीचें बक्षीस नगद रुपये नऊशें मिळाले! एका विधवा बाईचा मुडदा अडविला त्या कामांत रुपये पांचशें रोख घेतले ! पुरुषां पेक्षां बायकांचे मुडदे अडविण्यांत किफायत जास्त असे.

२ दुराचारावर कर:—दुराचारी स्त्रिया व थोड्याशा निर्लज्य विधवा यांची तर नोंदच जशी काय ठेविली होती. दर एक स्त्री मागें निदानपक्ष पन्नास रुपये हबकावयाचे

आणि पुनः मनमानेल तसा चावटपणा करावयाचा. दुराचारी-पुरुष कांहीं दाद देत नसत. जरासा संभावित किंवा प्रतिष्ठित असला ह्मणजे त्यानें फारतर पंचवीस रुपये द्यावयाचे.

३ चोरांची सांथीदारीः--आमच्या धंद्यांतली मोठी किफायत ह्मणजे चोऱ्यांच्या खटल्यांत. चोर, सोनार, सराफ, आणि चोरी झाली ह्मणून फिर्याद करणारा, व वहीम कोणावर येई तीं माणसें, इतक्या कडून आह्माला पैसे सारखे खावयाला मिळावयाचेच. हजारांची चोरी झाली कीं निदान बाग पंधराशें रुपये पोलीसांच्या खिशांत उतरावयाचेच व ते सारे कांहीं एकट्या हवालदाराला मिळावयाचे नाहींत. जमादार किंवा फौजदार यांचे त्यांत मोठमोठाले हिस्से असत. दोनवर्षें मी हवालदारी केली. त्या अवधींत वीस चोऱ्या झाल्या. पन्नास हजारांचा माल चोरीस गेला होता. माझ्या एकट्याच्या हिश्शाला सात हजार रुपये आले.

४ निपुत्रिकांचा पंचनामा–निपुत्रिक कोणी मेला आणि त्याचा पंचनामा करून मालाची मोजदाद करण्याचा प्रसंग आला कीं ती आमची मोठी पर्वणी. असल्या पंचनाम्याला जमादार फौजदार यावयाचे. लहान सानाला हवालदार. एक गुजर निपुत्रिक मेला. तो गरीब असें वाटे. त्याच्या इष्टेटीचा पंचनामा केला. रोकड तीस हजारांचा माल निघाला. दोघां दूरच्या वारसांनीं पळवापळव चालविली. त्यांना पकडलें. शेवटीं ते वारसदार, पंच व मी असे एक झालों आणि दोन हजारांची याद करून अठ्ठावीस

हजार रुपये आह्मी लांबविले. माझ्या वांट्याला तेरा हजार रुपये आले ! एक नायकीण मेली. दोनशें रुपयांची याद करून मी घरीं पांच हजार रुपये नेले !

जमादार बनलों.

पांचशें रुपये दरबारखर्चे केला. हंगामी—अॅक्टिंग—जमादारी-- तीन महिने करून कायम जमादार झालों. जवळ रुपये तीस हजार जमले. जमादारींत फारसें मला कसब करावें लागलें नाहीं. हवालदार, नाइक, शिकारी उठवून आणीत, आणि माझ्या हातावर आपोंआप दक्षिणा पडत असे. जमादारींत पैशाचा लाभ फारसा झाला नाहीं. कनकाकडलें लक्ष कांतेकडे गेलें. बायकांच्या नादीं लागलों; या कामांत मीं कृत्यें केलीं तीं माझ्या तोंडानें सांगवत नाहींत. तीं पातकें मीं केलीं त्या साठीं यम राजाला निराळा नरक करून ठेविला पाहिजे.वेश्या. गरती स्त्रिया! कांहीं कांहीं उरलें नाहीं. वरिष्ठांची मर्जी संपादण्याला द्रव्याचा उपयोग मी करण्याचें सोडून दिलें पैसा खर्च करवेना व पैशापेक्षां बलवत्तर साधन कांता—त्याही परभारें—त्यांचा उपयोग मीं करूं लागलों. जमादार तीन वर्षें होतों. तीन वर्षांत सगळे दहा बाराच हजार रुपये मिळाले.

फौजदार झालों.

फौजदारींतल्या बहारी सांगण्या पूर्वीं कुटुंबांतल्या हकिकती कळविणें राहून गेलें तें कथन करितों. मला पैसा खूप

मिळत गेला. पण सुख लागेना. केलेले अन्याय मनाला जांचत. पण हृदय कठीण होऊन गेलें. लांच खाल्याचें उघडकीला येईल ही भीति उरली नाहीं. पण गृह सौख्य व ज्ञातींत मान राहीना. आई माझी भलत्या फंदाला लागली. आमच्या घरीं मुसलमान शिपाई तैनातीला असत,त्यांच्याशीं तिचा संबंध ह्मणून लोक बोलूं लागले व बायको मला सांगत असे. आईनें बायकोच्या भलत्यासलत्या कागाळ्या माझ्या कानावर घालाव्या. बहीण माहेरीं वारंवार येई. पुढें पुढें ती एका पारशा बरोबर हात धरून गेली असें कळलें. झालें! घरांत सुख मला कसचें मिळतें ? मला एकंदर मुलें सहा झालीं. एक मुकें; दोन मुली आंधळ्या; तीन मेलीं; आईला घरांतून बाहेर काढूं, कां, बायकोला सोडूं,कां काय करूं ? घरीं आलों ह्मणजे हें असलें घर पाहून जीव संतापे. तेव्हां गांजा ओढून बेशुद्ध पडे. गांजानें तलफ भागेना;दारू पिऊं लागलों. दारूला डाळभात अन्न काय कामाचें ? ह्मणून दुसरें अभक्ष्य भक्षणाची सुरवात करणार, तों बायको माझी मेली. पहिल्या महिन्यांतच लग्न ठरलें. मोठी सुंदर रूपवान बायको मला मिळाली. मला असें कांहीं ह्मणतां येत नाहीं. माझ्या पैशाला आणि हुद्याला मिळाली. माझें उतार वय झालेलें, चाळिशी उलटलेली. दारुड्या होत चाललों. इतक्यांत माझ्या वर एक खटला शेकला. पांच सहा महिने सस्पेंड होतों. पांच सहा हजार रुपये खर्च आला. आणि पुनःकामावर आलों. त्याच वेळीं माझी आई एकदांची मेली.

घरात बायको आणि मी दोघेंच. पहिल्या बायकोचीं मुकीं आणि आंधळीं मुलें तीं संभाळावयाला एक बाई ठेविली. माझा बाहेर अनाचार, त्याच्या पन्नासपट माझ्या घरांत, असा बोभाटा ऐकूं येऊं लागला. माझ्या घरची ही दुसरी बायको आल्या पासून दहा हजाराचे दागिने नाहींसे झाले. माझे दागिने हरवले. कोणा पुढें बोलण्याची सोय नाहीं. चौकशी करण्याला मार्ग नाहीं. चार चौघांत बसावयाला गेलों तर तेथेंही गोष्ट काढतां येईना. इतके दागिने गेले तरी कसे? कोणी नेले असतील हा संशय मला घेरून बसला. घरांत आलों कीं समाधान नाहीं. सरकारी कामही पुष्कळ व सारा वेळ केलें तरी संपण्या जोगें नव्हतें. त्यांतच मी दंग असे. शाहणा सुशिक्षित असा समाज, पण त्यांत जाऊन मिळण्या मिसळण्याचा प्रसंगच अम्हाला येत नसे. समाजांत माझी इभ्रत कांहींच नव्हती. समाजांतली अब्रू किंवा थोरवी लग्न प्रसंगांत चांगली कळते. घराणेदारपणा आतां आमच्या समाजांतून उठूनच गेला असें मला वाटलें. माझें दुसरें लग्न होतांना मुलींच्या उड्यावर उड्या पडत. त्या सर्वांचें कारण माझ्या जवळची रोकड पुंजी व माझी सरकारी चाकरी ! मी माझा मोठेपणा त्या चाकरीवर व पैशावर खुशाल मिरवीत होतों. शहाणपणा, विद्वत्ता किंवा घराणदारपणा याची मला कोठें उणीवच दिसली नाहीं. या जगांत मोठ मोठालीं कामें भीतीवर चांगलीं साधतात तशीं कशानें साधत नाहींत. मी फौजदार, माझा दरारा केवढा ?

मला सारेजण चळचळ कांपत हें मला ठाऊक होतें. असो; फौजदार झाल्या नंतर माझ्या हातून अनेक अनन्वित कृत्यें घडलीं त्यांची साद्यंत हकिकत सांगणें दुर्घट आहे. माझ्या हातून काय अन्याय, किती दुष्कर्में व कोण पापें घडलीं तीं सांगण्या पेक्षां कोणतीं घडावयाचीं राहिलीं हेंच सांगणें थोडक्यांत संपणार आहे. माझ्या पातकांचे ठळक ठळक व ढोबळ असे वर्ग करून तें सांगितलें तरच माझी कर्मकथा थोडक्यांत संपेल. ह्मणून तोच मार्ग मला प्रशस्त दिसतो.

जे गुन्हे लोकांनीं करूं नयेत, केले असतां त्यांना पकडून यथा योग्य शासन करावें ह्मणून सरकारानें माझी नेमणूक केली, ते सर्व गुन्हे मी स्वतः आधीं केले !

काय सांगावें ? माझ्या एकेका दुष्कृत्यांची नुस्ती आठवण झाली तर स्वतः माझ्या अंगावर थरारून शहारे उभे राहतात ! माझीं कृत्यें ऐकून लोकांच्या मनाची स्थिति कशी होईल हें मीं आणखी कशाला सांगावें ?

निरापराध्याचा छल--शंभर अपराधी सुटले तरी बेहत्तर पण एका निरपराध्याला शिक्षा होता कामा नये, हा बाणा इंग्रज सरकारच्या न्याय देवतेचा. त्या न्याय देवतेच्या वतीनें आह्मी पोलीस काम करणारे. आमच्या पुढें कोणी इसम आला कीं, पहिल्यानें त्याला मनसोक्त शिव्या द्यावयाच्या. त्याची अप्रतिष्ठा जितकी शक्य तेवढी करावयाची. त्यांला मान आहे, अब्रू आहे, तो माणूस, ही कल्प-

नाच जणों काय आह्मांला शिवत नाहीं, असें वर्तन दररोज आणि सांज सकाळ दिवसभर आमचें चाललेलें ! " मर्म-वाक्यमपिनोच्चरणीयं " असें आमचे स्वामी महाराज सांगत असतात ! शिव्या मान खंडना करणें संपलें ह्मणजे त्या बिचाऱ्याला चोप देण्याची आमची दुसरी कामगिरी. थापा देणें, खोटें बोलणें, बाहणा करणें यालातर सीमाच नाहीं. ही जीभ माझी किती खंड्या खोटें बोलली असेल याचें गणित कसें व्हावयाचें? जिभेचा उपयोग शिव्या देणें, मर्म भेदी भाषण करणें, खोटें बोलणें, थापा देणें, याच्या पलीकडे माझ्या हातून झालाच नसेल ! साधुसंत जिभेची प्रार्थना करीत ईश्वर नाम घे ह्मणून तिला सांगत असतात. आणि आम्हीं आ-पल्या जिभेचा हा असा उपयोग केला ! मनुष्याला अब्रू प्राणा पेक्षां प्यार. अब्रूसाठीं कैकजण जीव देतात. अब्रू भरा-भर घेत सुटणें हें आमचें पहिलें काम !

चार पैसे बाळगून आहे, किंवा पत चांगली आहे अथवा आप्त, इष्ट, स्नेही, गणगोत खाऊन पिऊन सुखी असा मा-णूस माझ्या पुढें आला कीं त्याचा छळ सडकून व जास्त झालाच. त्यानें पैसे पुढें केले कीं मग आमचा जीव थंड ! जणोकाय पैसे बाळगून तो आहे हाच त्याचा आमच्या मतें मोठा गुन्हा. उद्योग धंदा करून, काटकसरीनें राहून त्यानें सांठविलेले पैसे आह्मी उपटले, ह्मणजेच आह्मी तृप्त होत असूं असें नाहीं. अन्यायानें, पापानें, दुराचारानें त्यानें पैसे मिळविले तर ते तो आपण एकटाच कसें घेऊन

बसला ? एकटाच कसा वापरतो, आह्माला दिल्या शिवा-य त्याला आह्मीं काय ह्मणून पचूं द्यावें, हा आमचा येथून तेथून जसा काय बाणाच !!

पैशासाठींच निरपराध्यांचा आह्मीं छळ करीत होतों असेंही नाहीं. सोम्यानें आह्माला चांगलें यथेच्छ चारलें, त्याला दोष मुक्त करून मोकळें सोडावयाचें; तर गाम्या गरीब आहे, त्याचा वाली कोणी नाहीं, त्याची दाद लागणें शक्य नव्हे, असें बघितलें कीं, घाल त्याच्या डोक्यावर सो-म्याचें पाप आणि दे त्याला ठोठाऊन शिक्षा, हा आमचा रोजचा खेळ. एक पाप करून आमची तृप्ति नाहीं. तिहेरीं चोहेरीं पापें एका झटक्यासरशीं व्हावयाचीं. सोम्यानें अपराध केला त्याच्याकडून पैसे उकळावयाचे आणि त्याला मोकळें करावयाचें; यांत पापें दोन. एक, अपराध्या-ला सोडून दिलें, अपराध्याला सामील झालों; दुसरें, लांच खाल्ला. सोम्याला मोकळा करण्यासाठीं गाम्यावर आग पाखडावयाची. निरपराध्यावर अपराध लादावयाचा हें तिसरें पाप. तो अपराध त्याच्यावर लागू करण्यासाठीं खोटे साक्षीदार उभे करावयाचे, खोटे कागद बनवावयाचे, हें चवथें, पांचवें पाप ! असा हा आमचा नित्यक्रम ! खोटे साक्षीदार उभे करणें, खोट्या जबान्या, खोटे जबाब, खोटा-पंचनामा, खोट्या डायऱ्या, खोटे रिपोर्ट अशा खोट्या का-माची तर खिजगणतीच नाहीं.

खून, दरोडे, चोऱ्या हे आमच्या रोजच्या कामांतले

मुख्य मुख्य खटले. खोटे कागद करणें. बायको पळवून नेणें,लांच खाल्ली त्याची चौकशी, इत्यादि अधून मधून येणारे खटले; पोटचें पाडलें, मारामाऱ्या, अफू वगैरे खाऊन जीव देणें, हीं परंपरा कधीं मधीं येणारीं. यानंतर मग बाकीचें सारें सटर फटर.

मी फौजदारीचें काम केलें त्यांत १८।१९ खुनाचे खटले आले. दरएक खुनामागें सरासरीनें मी पांचसहा हजार रुपये घरांत नेले. ह्मणजे इतका लांच खाल्ला जवळ जवळ एक लाखाची पुंजी मी फक्त खुनाच्या मुकदम्यांत केली. खुनाच्या तपासाकरितां ह्मणून फिरतांना सरबराई. भत्ता, पगार. वाटखर्ची,छाट छूट मिळकत याचा तर पत्ताच नाहीं.माझ्या कारकिर्दींत झालेले एकेक खून ह्मणजे एकेक गोष्टच. मासल्यासाठीं एकदोन खुनांच्या गोष्टी सविस्तर सांगतों, ह्मणजे माझ्या पापकर्माची व जगांतल्या अन्यायाची अनायासें ओळख पटेल. कोणाची झालीतर, करमणूक होईल, कोणास उपरति उपजेल; कोणी सावध होतील; अथवा कोणी तमल्या मार्गाकडे स्वप्नांत सुद्धां ढुंकून जाणार नाहींत.

खुनाच्या गोष्टी.

बदमाषपूरचा खूनी मुकदमा—बदमाषपूर ह्मणून एक बराच मोठा गांव आहे. त्या गांवांत विठू गोखल्या ह्मणून खाऊन पिऊन एक सुखी गृहस्थ रहात होता. वडिलोपार्जीत इनाम त्याचें हजार दीड हजाराचें असे. त्याचा गोविंदा ह्मणून

एकुलता एक मुलगा. त्याला जालन्याच्या एका श्रीमंत इनामदारानें आपली मुलगी दिली होती. विठूची बायको मेली. विठू दोन्ही डोळ्यांनीं आंधळा झाला. एकुलता एक मुलगा तोही पटकीनें मेला. घरीं विठू आणि त्याची सून राधा,वीस एक वर्षांची. दुसरें कोणी नाहीं. विठूच्या घरीं हसन नांवाचा एक मुसलमान शिपाई होता. मी तालुक्याच्या गांवीं फौजदार. एके दिवशीं लहरीपूरच्या पाटीलकुलकर्ण्यां कडून रिपोर्ट आला कीं गांवा बाहेरच्या विहिरींत मुडदा सांपडला आहे. कुजून तिसरे दिवशीं वर आला. पंचनामा झाला, आपण तावडतोब यावें. मी गेलों. मुडदा पाहिला. डाक्टराकडे तो रवाना केला. त्याचा तपास चालविला. घरीं सुनेची जबानी घेतली."माझा सासरा आंधळा. चार दिवस झाले कोठें त्याचा पत्ता नाहीं. मी वाट पहातें." नौकर घरीं तिघे, त्यांचा जबाबही तसाच. आतां पुढें काय? म्हातारा आंधळा म्हणून पाय निसरून पडून मेला असें ठरवावयाचें. त्यांत खोटें कांहीं नाहीं. हा खून असें कांहीं आमच्या ध्यानीं मनीं सुद्धां आलें नाहीं. दत्तक घेण्याची त्या बाईची इच्छा. दोघां तिघां भाउबंदांचीं मुलें होतीं, त्यापैकीं कोणतें तरी एक पसंत ती करीत होती. एका भाउबंदाचा मुलगा तिनें दत्तक शेवटीं घेतला. दत्तविधान झालें. इष्टेट घरीं कांहीं नाहीं, कर्जच आहे, अशी आम्हाला बातमी. आम्हीही फारसें मन कांहीं घातलें नाहीं. जिकडल्या तिकडे सारें झालें. म्हाताऱ्याचा मुडदा जाळण्याला परवानगी मिळाली. डाक्टराचा अभिप्राय

पाण्यांत बुडल्यानें मेला. संपलें ! खून कांहीं नव्हे.'अकस्मात' असें ठरलें. तीन महिने गेले. ज्या भाउबंदाचा मुलगा बाईनें दत्तक घेतला नव्हता त्यानें खटपट सुरू केली. एक अर्ज निनावी आला."बाई पांच महिन्याची गरोदर. पोटचें पाडणार आहे.पाटील कुलकर्णी खटला छपविणार आहेत." मीं लगेंच गेलों. तपास गांवांत केला. गुण गुण कळली कीं, खरें आहे. गुन्हा झाल्या शिवाय आह्मांला कांहीं करितां येत नाहीं. बाई गरवार हा कांहीं पिनलकोडांत गुन्हा नव्हे. मी त्या गांवींच दोन दिवस मुक्काम केला. बाईचा नौकर हुसेन. त्यानें, मी असें तोंपर्यंत, माझ्या मुक्कामावर उगीच बसलेलें असावें. मला शंका आली. बाईच्या घरीं कांहीं मला जातां येईना. पण मी गेलोंच त्या दिवशीं संध्याकाळीं त्या बाईच्या घरीं. माझा विचार कीं, समक्ष काय तें पहावें. बाई जातीनें जैनाची. मी गेलों. घरीं बसलों. बाई कांहीं बाहेर येईना. तिनें दृष्टीस पडावें अशी माझी इच्छा. मी खनपट्टीस बसलों असें पाहतांच बाईनें माझ्या पुढें एक पुरचंडी टाकिली. ती मी खिशांत घातली. सोन्याचा कांहीं दागिना होता. मीं समजलों. मग बाई पुढें आली. गरवार ही माझी खात्री झाली. पण मनांत आलें, म्हातारा मेला तो कांहीं पाय घसरून पडून मेला नाहीं. त्याचा खूनच झाला ! आणखी दोन दिवस मी मुक्काम त्या गांवीं जास्त केला आणि तपास चालविला. दत्तक दिलेल्या मुलाला घेऊं नये असें म्हातारा म्हणत होता इतकी बातमी कळली. ज्याचा

मुलगा दत्तक घेतला नव्हता त्याला मी बोलावून आणिलें. त्यानें आपला मुलगा दत्तक म्हातारा घेणार होता, पण या भाऊबंदानें त्या बाईचें मन वळवून चारपांचशें रुपये खर्चून म्हाताऱ्याला मारून पोलिसच्या मदतीनें हें कर्म केलें असें सांगितलें. "म्हाताऱ्याला मारून" हें ऐकतांच मी चपापलों. तो कांहीं पुढें जास्त बोलेना व सांगेना. मग मी चौकशीला सुरवात केली. त्या बाईचे घरचे गडी पहिल्यानें पकडले. ते कांहीं कबूल होईनात. भाउबंद मंडळी पकडली. मारहाण सुरू केली आणि त्या सर्वांना घेऊन तालुक्याच्या गांवीं गेलों. चांगली आठ दिवस समजूत देत होतों. मग एकदाचा सुगावा थोडथोडका लागूं लागला. गांवचे तीसचाळीस लोक धरून आणिले. कोणी पंचवीस, पन्नास, असे रुपये पोलिसांला, मला एकट्याला नव्हे, देऊंलागले. मला एकानें एके दिवशीं नुस्त्या सोन्याच्या चिपा पांच आणून दिल्या. त्या तर मी खिशांत टाकिल्या पण ह्या कोठून आल्या, कोण पुरवितो, याचा तपास ठेविला. मग एके दिवशीं मी वेष बदलून त्या गांवीं गेलों. सगळ्या गांवाचा कानोसा घेतला. बाईनें पोटचें पाडलें एवढें कळलें. तीही खात्री करून घेतली. तिचा स्नेही कोण याचा तलास लागला. त्याला पकडून नेलें. खून उघडकीस आला. तो त्या गांवचा एक कोमटी सराफ होता. त्यानें म्हाताऱ्याला उचलून विहिरींत टाकून दिलें. घरांत कांहीं खून केला नाहीं. विहिरींत त्याला नेऊन टाकिलें. पण तो त्या विहि-

रीकडे गेला कसा? हें कांहीं समजेना. हा कोमटी त्या बाईशीं लागू. म्हाताऱ्याच्या दोन जमिनी याला घ्यावयाच्या होत्या. दत्तक जुळविण्या करितां एक हजार रुपये यानें मध्येंच खाल्ले. म्हाताऱ्याच्या कागदपत्राचें गांठोडें यानें उपटून नेऊन कागद नाहींसे केले. गोविंदाचा हा स्नेही; दोन खोटीं खरेदी पत्रें यानें केलीं. घरचा दहा वीस हजाराचा मालक. झालें ! खुनाचा तपास लागला. कोमट्याला फांशीची शिक्षा झाली. मला या खटल्यांत सुमारें सहा एक हजार रुपये मिळाले. या खटल्यांत इतकें कांहीं आश्चर्य नाहीं. पण खुनाच्या खटल्यांतला हा माझा ओनामा म्हणून सांगितलें. याच्या पेक्षां दुसरा खुनी मोकादमा आश्चर्यकारक आहे.

दत्तकमुलाचा खून

—या व्यापारी गांवांत तीन पिढ्याचा श्रीमान व्यापारी होता. घरीं रोकड पांच सहा लाख. कापसाचा मोठा व्यापार त्याच्या दुकानीं चालत असे. त्याला मूल होईना. त्यानें मुलासाठीं तीन बायका केल्या. मूल नाहीं. म्हातारपण येत चाललें. त्यानें बहिणीचा मुलगा दत्तक घेतला. मुलगा आठ नऊ वर्षांचा भारी लाडका. पाडव्याच्या दिवशीं मुलाच्या अंगावर तीन चार हजाराचे दागिने घातले. संध्याकाळ झाली, मुलगा नाहीं. रात्र झाली, मुलगा नाहीं.. एक दिवस गेला. दोन दिवस झाले. मुलाचा पत्ता नाहीं. चौथ्या

दिवशीं ओढ्याच्या बाजूला झुडुपांत एक पोतें. त्या पोत्या सभोंवती गिधाडे बसतात, उडून पळतात. घाण सुटली. गांवांत वर्दी गेली. पोलीस रिपोर्ट आला. मी शोधाला गेलों. तपास चालविला. मुलाचा मुडदा हें ठरलें. खून झाला यांत शंका उरली नाहीं. दागिने मुलाच्या अंगावर जशाच्या-तसे. दागिन्यासाठीं खून नव्हे असें ठरलें. कां खून झाला कसें कळावें ? कोणी केला, पत्ता लागेना. मुडद्याची व्यवस्था लाव-ण्याला परवानगी दिली. मुडदा घातलेलें पोतें होतें त्याच्या वर मुंबईच्या एका पिठाच्या गिरणीचें नांव. त्या नांवाचीं पोतीं गांवांत हजार बाराशें. खुद्द त्या सावकाराच्या घरींच तीं मुंबईहून आणविलेलीं. व्यापारी मंडळी कांहीं खून कर-णारी नव्हे. पोतीं व्यापारी लोकांच्या घरीं. मोठें गूढ पडलें. म्हातारा व्यापारी दत्तक मुलाचा खून झालेला पाहून भ्रमि-ष्ट झाला. पुढें तपास कसा लागणार ? तपासा शिवाय गुन्हा म्हणजे पोलीसाचें नांव बद्द ! खोटा अरोपी तयार करावा कोर्टांत सुटला तर आपलें काय जातें ? आपण तपास लावला, आपल्या वरील ठपका गेला. खोटा आरोपी शोध-ण्याच्या आम्ही उद्योगाला लागलों. व्यापारी, जातीचा शिंपी होता. थोरल्या बायकोनें अपल्या बहिणीचा मुलगा दत्तक घेण्याची खटपट चालविली. भाउबंद आपला देण्याकरितां टपलेले. दोघांचें भांडण जुंपलें. खटपटी सुरू झाल्या त्या मुळें खून बाहेर पडला. नणंदेचा मुलगा दत्तक नसावा, बहिणीचा हवा म्हणून थोरल्या बायकोनें घरच्या वसूली शिपायाकडून

खून करविला. दुकानांतले पांची गुमास्ते अनुकूल करून घेतले. एकेकाला दोन दोन हजाराची तिनें लालूच दाखविली. बहीणही घरची बरी होती. बायकोनें कबूली जबाब दिला. तिनें आपल्या दोघां संवतीचींही नांवें उगीच गुंतवून दिलीं. आह्मांला लूट बरीच मिळाली. मला एकट्याला दहा हजार रुपये ! खटला चालला असतांना ह्मातारा भ्रमिष्ट होऊन विहिरींत जीव देऊन मेला. बायकोला, गुमास्त्यांना काळे पाण्याची शिक्षा झाली. मुसलमानाला फाशीची सजा. दोघी संवती निर्दोष ह्मणून ठरल्या असत्या, पण बेवारशी इष्टेट ह्मणून सरकारांत जमा करिते वेळीं हात धुऊन घेण्यास फावावें अशासाठीं खोटा पुरावा आह्मीं पुष्कळ तयार करून त्यांस पांच पांच वर्षांच्या सजा देवविल्या !

भावाचा खून.

—नांवाचा एक लिंगाईत मोठा सावकार—चा राहणारा. त्याला एक धाकटा भाऊ. शिवप्पाला पोरबाळ नव्हतें. मोठा हुषार आणि संभावित असा त्याचा पुष्कळ दिवस लौकिक. दोघा भावांच्या दोन बायका; धाकट्या भावाचा एक तीन चार महिन्याचा ताना मुलगा; एवढी घरची मंडळी. दोन तीन लाखांची असामी. धाकट्या भावाच्या बायकोशीं वडीलदादा लागू असा बोभाटा. धाकट्या भावाच्या कानावर ही गुणगुण गेली. मी निराळा राहतों, माझी वांटणी टाक, ही त्यानें कुरकुर चालविली. भाऊ कांहीं वांटणी देईना. कोर्टांत फिर्यादीचा प्रसंग आला.

तयारी चालली, वांटण्या झाल्या. पांच हजार बक्षीस हें वकीलाशीं बोलणें पक्कें झालें. दोघां नवराबायकोनें घर सोडण्याचा निश्चय केला. धाकट्या भावाची बायको घर सोडून जाण्याला नाखूष होती. धाकटाभाऊ आपल्या चुलत सासऱ्याकडे जाणार होता. रात्रीं जाऊन खोलींत निजला. बायकोही खोलींत होती. मध्यें जागा होऊन पाहतों तर बायको नाहीं. पाळण्यांत मूल होतें. भावजईनें सांगितलें,"बाहेर शौच्याला गेली आहे,आतां येईल." हा परत जाऊन निजला. त्याला झोंप लागली, इतक्यांत दिवे मालवले आणि मोठी पहार घेऊन सात आठ जखमा धाकट्या भावाच्या डोक्यावर केल्या. सकाळीं वर्दी खून झाल्याची. श्रीमंताच्या घरचा खून ! पैशाचा लोभ हें कारण असावें. पण निराळेंच. घरच्या गड्यानें खून केला. तो गडी नाहींसा झाला हा बाहणा. त्या गड्याला वडील बंधूनें मोंगलाईत कांहीं कामासाठीं पाठवून दिलें होतें. गड्यावर खून लादा हा आग्रह वडील बंधूचा. आम्हांला पैसेही त्यानें मनसोक्त चारले. खून पचवा, पंचवीस हजाराचे तोडे घरीं आणून टाकितों ही आशा लाविलेली. गडी फांसावर चढवून देण्याची माझी तयारी व कबूली. पण माजिस्ट्रेट पुढें साक्षींत स्वतः स्वारी ढांसळून बसली. माजिस्ट्रेटला संशय आला. त्यानें परभारें पोलीस सुपरिंटेंडेंटला लिहून जास्त नेटानें चौकशी चालविली. धाकट्या भावाच्या बायकोनें सर्व हकिकत कळविली. वकील, बालिस्टर यांना या

मुकदम्यांत पंचवीस तीस हजार रुपये मिळाले.पोलीसांच्या वांटणीस वीस हजार आले! वडील भाऊ फांशीं गेला!

किफायतीचा खून.

—या व्यापारी शहरांत माझा वर्ग झाला. गांव नुस्ता व्यापाराचा. पेठेंत एक नायकीण ऱ्हात होती. तिच्या सर्वांगाला लोखंडी मेखा ठोकून, दोन हाताला दोन, तोंडांत एक,शरीरांत एक,दोनी मांड्यांत, अशा सहा लोखंडी मेखा ठोकून, कोणी खून केला होता. त्याची चौकशी माझ्या कडे आली. तिचा ऐवज चांगला जवळ जवळ पंचवीस हजाराचा. त्यांतील वीस हजार मीं एकल्यानें लांबविले. पंचनाम्यांत पांचच हजार दाखल केले. कोणी वारस नाहीं, कोणाची तक्रार येण्यासारखी नव्हती.अशी पर्वणी क्वचीतच साधते! झालें; चौकशी साठीं एकेका दुकानदाराला आणावें, थोडें त्याला कुचंबवावें, कीं कमींत कमी हजाराची थैली माझ्या घरीं! मोठे व्यापारी पेठेंत साठ पांसष्ट. तितक्यांनीं एकेक हजार मला दिले. या एका खुनानें माझ्या घरीं पाऊण लाखाची भरती केली. शेवटीं खुनाचा पत्ता लागला नाहीं. खुनी मोंगलाईंत पळून गेले अशा बाहण्यानें खून बिन तपाशीं सोडून दिला. इन्स्पेक्टर ह्मणे कसा तरी तपास लावा. पण एका रांडेच्या खुना साठीं निरपराध्यावर खुनाचा आरोप माझ्यानें आणवेना!!

चमत्कारिक खून. फायदाच नाहीं !

एक फुटकी कवडी न मिळतां खुनाचा पत्ता लागला नाहीं, असा एकच गुन्हा माझ्या अमदानींत घडला. नदीच्या काठावर एक नागडें उघडें नुस्तें धड. त्याचें शीर कापून नेलेलें. कांहींएक पत्ता लागला नाहीं ! व एक दमडीही आम्हाला मिळाली नाहीं.

एकंदर खुनांपैकीं रुपायांतले चौदा आणे खून बायकांच्या पायांत होतात. पैसा हें दूरचें कारण. जवळचें म्हणजे बायका. शुद्ध पैशासाठीं बरेच खून होतात. पण त्यांची संख्या बायकांसाठीं झालेल्या खुना इतकी नसते. खून झाला कीं तपास आमचा सुरू व्हावयाचाच. तपासांत आम्हाला दक्षणा चांगली मिळे. खुनाचा तपास लागला कीं मग पुरावा मात्र भारी खोटा करावा लागे. एकदां आमची सोळा आणे फजिती झाली. पुराव्या करितां हाडकें आम्हीं आणिलीं होतीं; तो मुडदा हिंदूचा म्हणून सिद्ध करण्यासाठीं डोकीचे केश आम्हीं हजर केले होते. जज्यानें डाक्टरच्या साक्षींत हीं हाडें माणसांचीं नव्हेत, यांत जनावरांचीं हाडें मिसळलेलीं आहेत, हे केश सडलेल्या डोक्याचे मुळासकट नाहींत, कातरीनें कातरलेले असें सिद्ध करून घेतलें व डाक्टरानें भर कोर्टांत सूक्ष्म दर्शक यंत्र आणि हाडकाचा सांपळा आणून जज्य साहेबां पुढें सिद्ध करून दिलें ! तेव्हां जी कांहीं आमची फजिती झाली ती सांगतां येत नाहीं.

असो. खुनाच्या एका भयंकर मुकदम्याची हकिकत सांगून " खून " प्रकरण संपवितों. याखुनाला मात्र बायकांचा कोठें कांहीं संबंध नाहीं किंवा द्रव्य हें साक्षात कारण नव्हे. या खुनांत आह्मांला कांहीं ह्मणण्या सारखी किफायत झाली नाहीं. व खुनाचा पत्ताही लागेना; पण अगदीं गरीब मात्र आह्मी भार्ग छळले. त्यांचे अनंत हाल केले. !

सावकार मारवाडी.

—गांवात एक मारवाडी होता. त्याच्या घरचीं सर्व माणसें लग्नाला गेलीं. तो एकटा घरीं होता. एके रात्रीं त्याच्या घरी चोरटे शिरले. चोरट्यांनीं घरांत एका कवडीला हात लाविला नाहीं. त्याला एका खांबाला बांधून घातलें. कंबरेला त्याच्या कागद पत्राचीं दप्तरें व हिशेबाच्या वह्या बांधून त्याच्या अंगावर राकेल ओतून त्याला सबंध पेटऊन सोडिला आणि चोर निघून गेले. घर जळूं लागलें तेव्हां लोक तें विजवावयाला आले. मारवाडी जळून फुकट बिचारा मेला.

त्या मारवाड्याचा ज्यांच्याशीं व्यवहार त्या सर्वांना आह्मीं धरून आणिलें, मार येथेच्छ दिला. उलटे टांगून पाहिलें. पण पत्ता ह्मणून लागला नाहीं. या खुनाचा आह्माला पत्ता लागला नाहीं व किफायतही पण दमडीची झाली नाहीं. !!

खुनाच्या खटल्या शिवाय फौजदाराचें काम करीत असतां इतर अवदानें कमींत कमी रोज चार पांच तरी आह्मी झोडीत असू. पैसा ही एक आमची दृष्टी. न्यायबुद्धि, सत्यपरायणता, गरीबांचा छळ, किंवा इतर कोणत्याही भलाईचा विचार एक घटकाभर सुद्धां माझ्या मनाला शिवला नाहीं. देवाचें भय कधींच वाटत नसे. साहेब काय ह्मणतील एवढेंच काय तें भय; साहेबांचा राग, शिरस्तेदाराची मर्जी, माजिस्ट्रेटाच्या डोळ्याचें भय, याच्या पलीकडे कोणाची कधींच आह्मांला पर्वा करावी लागत नसे; देव, देवाचा रोष, पाप, पापाचें प्रायश्चित्त, लोकलज्जा, लोकभीति, स्वजन, गणगोत, यांतील कोणा एकाची आणि एक दिवस सुद्धां मला कधींच पर्वा वाटली नाहीं! पैसा माझें दैवत. साहेब, शिरस्तेदार व माजिस्त्रेट यांच्या पुढें थुंका झेलत नाचणें माझें शील. वकील व सरकारी अधिकारी यांच्या पुढें पुढें असावें एवढी माझी कर्तव्यता. त्याच्या पलिकडे कांहीं एक नाहीं. अशा ताल्यांत मी आनंदानें दिवस काढीत होतों. तंबाखू भरपूर व यथेच्छ खावा. पण त्याबद्दल एक दमडी खर्चावयाची नाहीं. दररोज शंभर दिडशें पानें मी चघळीत असें, पण त्या बद्दल एक दमडी खर्च केली नाहीं. शिपायाला पाठवून तांबोळ्याकडून पानें नित्य ताजीं ताजीं आणवावीं. माझ्या कृपेनें शिपायानांही फुकट खावयाला पानें मिळत. माझ्या भेटीला किंवा माझ्यापुढें कामाला कोणी येत ते मला चघळावयाला पानें यथेच्छ पुरवीत. म-

वून मधून विडीही मी पीत असें. रात्रींच्या वेळीं बाटली बाईची भेट घेत असें. पण त्या भेटी बद्दलही मला कधीं खर्च आला नाहीं. वकील, कलाल, एक दोघे विद्वान मित्र, यांच्या दयेवर माझें हें व्यसन चाललें होतें. विश्वयोषितांच्या भेटी घेण्यांत मी तत्पर होतों पण तेथें ही मला कधीं दमडी खर्चावी लागली नाहीं. गाणें बजावणें ही मी ऐकत असें, पण कधीं त्या बद्दल मला कांहीं खर्चावें लागलें नाहीं. फुकट व मुबलक व्यसनें माझीं चाललीं होतीं. कधीं त्यांना खंड ह्मणून पडला नाहीं. मात्र दुःखाची गोष्ट एवढीच कीं एकानेंही मला उपदेश केला नाहीं; किंवा असें करूं नको असें साक्षात अगर परंपरेनें सुचविलें नाहीं. मित्र,वडील धारे,ह्मातारे, प्रतिष्ठित यांचें हें काम. त्यांनीं तें बजाविलें नाहीं. त्यांनीं, मी असा पापकर्मांत अष्टोप्रहर लोळत होतों, त्यावद्दल एक चकार ही शब्द माझ्यापुढें काढिला नाहीं. जो तो "हां चालुद्यां, गमजामारा, तुह्मीं खा आणि मलाही चारा." याच उपदेशाचा भेटे. सकाळ पासून निजे तों पर्यंत पापा शिवाय दुसरी गोष्ट नाहीं. एके दिवशीं घरीं वडिलांचें श्राद्ध आलें. तें श्राद्ध करण्याचें ठरविलें. वडिलांच्या श्राद्धाची तिथी मात्र मी चुकूं दिली नाहीं. देवाला कधीं मी जात नव्हतों; देवाची कधीं मला आठवण झाली नाहीं किंवा देवाची गरज वाटेल असा प्रसंगही आला नव्हता. साहेब माझा देव; पैसा उपटणें ही माझी पूजा आणि लोकांचा छळ व व्यसनांत लोळतां येईल तेवढें लोळणें, हाच माझा धर्म असा

प्रकार चालला होता. श्राद्ध तिथीच्या दिवशीं जेवणास वेळ फार झाला. त्या दिवशीं अनायासें आदितवार आला होता. गुन्हा झाल्याचें ही चार सहा दिवस कोठें वर्तमान नव्हतें. मी असा, स्नान करण्याची वेळ केव्हां येते ह्मणून, वाट पहात होतों, इतक्यांत मला झोंप लागली; आणि माझ्या हांतून फाशीं गेलेला रहिमान पिंजारी माझ्या पुढें येऊन स्वप्नांत उभा राहिला. त्यानें मला अनंत शाप दिले, अनेक शिव्या हांसडल्या आणि तुझ्या सर्वांगांत किडे पडून हाल हाल होऊन तूं मरशील, तुझ्या घरादाराचें वाटोळें होईल, तुझें निसंतान झाल्याशिवाय राहणार नाहीं, असें माती फेंकीत तो मला शापूं लागला. शेवटीं एक सुरा घेऊन भोंसकण्यासाठीं माझ्या छातीवर त्यानें पाय दिला हें पाहतांच मी भीतीनें गांगरून ओरडूं लागलों; मग मला दारांतल्या शिपायानें हालवून जागें केलें, आणि पहातों तों स्वप्न असें ठरून बरें वाटलें. पण आजवर मठ्ठ झालेलें मन किंवा निर्लज्य व कठोर बनलेलें अंतःकरण आतां जागें होऊं लागलें! त्या दिवशीं घरीं श्राद्ध होतें. बाहेर कोठें गेलों नाहीं. रात्रीं दारूही पिणें बरें वाटेना. घरींच निजलों. रात्र भर स्वप्नें.! केलेलीं कर्में सारखीं आठऊं लागलीं. मी छळलेलीं माणसें माझ्या स्वप्नांत सूड घेण्यासाठीं धांवून आलेलीं मला दिसत. माझे तीर्थरूप स्वप्नांत येऊन मला ह्मणाले "मेल्या नंतर तुझी गति काय ? तुला पाणी कोण पाजणार ? तुझी संपत्ति तुझ्याबरोबर येईल काय ? पापाचा

झाडा आतां कसा देशील ?" लगेच मी जागा झालों. मन कावरेंबावरें झाल्यामुळें रात्रीं तसाच बाहेर पडून दारूचा ग्लास झोंकून पुनः घरीं येऊन पडलों. घरांत पाहतों तों बायकोचा कोठें पत्ता लागेना. दारूच्याच मी धुंदींत! तेव्हां तसाच पडलों. सकाळीं आठ वाजतां जागा झालों. रात्रीची अर्धी अधिक आठवण होती. बायकोला हाक मारून विचारिलें "रात्रीं कोठें होतीस? मी आलों तेव्हां घरात नव्हतीस." तिनें उत्तर दिलें "घरचे कोणीकडे गेले याचा शोध करावयाला गेलें होतें!" या उत्तरानें मस्तक फिरलें. तिच्यावर शिव्यांचा वर्षाव केला. ती ही संतापली. तिलाही भान राहिलें नाहीं. तिनें बेजा उत्तरें यथेच्छ दिलीं. दोघांचाही संताप अनावर झाला. "वाटेल तितक्या घरीं मी रात्रीं फिरणार. तुझ्या बापाची काय भीति"? असें मी ह्मटलें. त्याला तिनें उत्तर दिलें "वाटेल त्यांना मी घरीं आणणार, तुमची कशाला परवा पाहिजे?" या उत्तरा बरोबर मी संतापून तिच्यावर लाथा बुक्यांचा वर्षाव केला. तिनें बोंब मारली. शेजारी, पाजारी, शिपाई, गर्दी जमा झाले. संताप, शरम या दोहींच्या तावडींत मी सांपडलों. घरांत बसवेना. तसाच निघून बाहेर गेलों. अकरा बारा वाजतां घरीं आलों. पाहतों तों बायको तेथें दिसेना. ती तिसऱ्या मजल्यावर होती. खोलींत आंतून कडी लाऊन बसली होती. बाहेरून कडी कुलूप घालून मी परतलों. ह्मटलें, इची अशीच खोडकी मोडावी. घरीं येऊन कसें तरी

जेवण केलें. स्वयंपाकीण बाईनें बायकोला खालीं पाठवून द्या, तिची समजुत करा, असें मला कळविलें. संतापाच्या भरांत तें कांहीं मीं ऐकिलें नाहीं. कचेरींत गेलों. तेथें मला "डिटेक्टिव्ह" ब्रँचांचमध्यें—गुप्तपोलिसाच्या खात्यांत—नेमिल्याचा हुकूम आला. संतोष झाला, पण तो सांगावा कोणास? पगार पन्नास रुपये वाढला. आनंद मानणारे कोणी नाहींत. पुण्यास जाण्याची तयारी केली. रात्रीं घरीं आलों. बायको उपाशीं म्हणून माडीवर जाऊन किल्ली कुलूप उघडणार होतों; सबब चाहूल घेण्यासाठीं वर चढूं लागलों. कानोसा घेतला. दोघांचा आवाज कानीं पडला. संशयानें पुरें पछाडलें. दार उघडलें. आंतली कडी उघडलेली होती. आंत पहातों तों कोणी नाहीं! बायको एकटी. पलंगाखालीं पाहिलें तों **करीम** शिपाई! माझें देहभान नाहींसें झालें. करीमाचा मी तर तेथल्यातेथें प्राण घेतला. माझ्या हातून खून घडला. बायको निसटून बाहेर गेली. तिचाही गळा दाबून प्राण घेणार होतों. तास दोन तास झाल्यानंतर जरा शुद्धीवर आलों. बायकोचे आतां आर्जव केले पाहिजेत, नाहीं तर ती हा खून एकदम उघडकीस आणील. तिची मर्जी धरल्या शिवाय गत्यंतर नाहीं असें वाटलें. बायकांची ती जात. खून झालेला तिनें पाहिला. ती कसची त्यावेळीं शांत असावयाची? झालें, कांहींएक मला सुचेना. रात्रभर डोकें भणाणून गेलेलें! स्वयंपाकीण बाईनें बायकोला आग्रहानें

जेऊं घातलें, मलाही तिनें जेवणाचा आग्रह केला. मी पाना-वर बसून उठलों. बायकोचें जारकर्म, मुसलमान शिपायाचा घरांत माझ्याहातें खून आणि तो छपविण्याची खटपट, अशा तीन संकटांत मी चूर. मांगाचें अंतःकरण, खाटकाचें मन व शुद्ध पाषाणाचें डोकें असतें तरी सुद्धां यांतून निभावलें नसतें. माझ्या घरांत दुसऱ्या मजल्या-वर पेटींत सोनें, चांदी व रोकड भरलेली होती. वीस हजा-राचे तोडे बाहेर काढून मोकळे ठेविले. माझ्या खात्यांतील लोकांसच ते चारावे लागले. आणि मी चारले! कसा तो खून मीं पचविला हें माझ्यानें सांगवत नाहीं. त्याची नुस्ती आठवण झाली तरी माझे अंगावर अद्याप शहारे उठतात. खून घडला तो कसा तरी पचवून मी गुप्त पोलीस खात्यांतल्या इन्स्पेक्टरीच्या जाग्यावर गेलों.

चोऱ्या, दरोडे, इत्यादिकांचा तपास आह्मांला लाग-ल्याशिवाय कधीं राहिला नव्हता. आमचा भाग आह्माला द्रव्यरूपानें मिळाला कीं गुन्ह्याचा तपास लाविला हें सरकारांत ठरावें, चोर सांपडले हें मालकांस कळावें, पोलीसानें पाठीस घेतलें ह्मणून बचावलों असें चोरांस वाटावें, ही माझी काम करण्याची शिताफी आतां येथें संपली. खुनाच्या तपासांत माझ्या घरचा खजिना भरावयाचा, अनेकांस निरपराधी असतां सडकून छळावयाचे, कांहीं तरी पुरावा गोळा करीत कोर्टापुढें मांडावयाचा, बनावट साक्षीदार, खोटा पंचनामा, विश्वामित्री सृष्टींतल्या जबान्या

लबाडीनें घेतलेले कबूली जबाव, आणि सांपडेल त्या भोळ्या व गरीबां कडून मिळेल तें बुचाडणें, हीं कामें येथून बंद पडलीं. साहेब, शिरस्तेदार व माजिस्ट्रेट यांच्या मर्जीच्या तालावर नाचण्याचीं पटाईतगिरी संपली. आणि या नंतर लोकांत मिसळावें, त्यांच्या तोंडच्या हकिकती खुबीनें काढाव्या, विश्वासाच्या जोरावर दगा हटकून साधावा, आपल्यालोकांचीं गुप्त कारस्थानें, हकिकती, साहेबापुढें सांगत सुटावें, भल्या माणसांवर सरकारची इतराजी होईल असे रिपोर्ट करावे, हीं कामें माझ्या मागें लागलीं. अधून मधून एखादें मोठें सावज सांपडे तेवढेंच कायतें. एरवीं पदरमोडिनेंच प्रपंच खर्च चालूं लागला !

पाप उघडकीस आलें.

एका जवाहिराची मोठी चोरी झाली होती, त्याच्या तपासाचें काम मजकडे आलें. तपास लाविला तर मला दहा हजाराचें जवाहिर मिळणार होतें. नाना वेष, नाना रूपें व नाना तऱ्हेच्या बतावण्या करीत मी भटकूं लागलों. एका गांवांतले तीन बैरागी संशयानें पकडून आणिले. एक अगदीं निरपराधी होता. त्यानें मी पकडल्या पासून अन्न खाण्याचेंच सोडून दिलें होतें व तो मला सारखा शापित असे. माझ्या हातून खून झाल्या दिवसा पासून माझी झोप नाहींशी झाली होती. झोप घेण्यास लवंडलों व डोळा लागला कीं त्या करीम शिपायाच्या किंकाळ्या

अकाळ विकाळ ऐकूं यावयाच्या ! दारूचें ग्लास झोंकून झोंपी जावें तरी तेंच. जेवण जाईना. अन्न पुढें मांडलेलें त्यांत करीमाच्या रक्ताचे शिंतोडे अन्नभर दिसावयाचे. घांस कांहीं गिळावयाचा नाहीं. अशी स्थिति माझी. बायको दृष्टीस पडली कीं अनावार संताप चढावयाचा. तिच्याशीं बोलणेंही व्हावयाचें नाहीं. घरांतलीं मुलें तीं आवडतना. अशा प्रकारें आयुष्याचे दिवस नोकरीच्या नादांत व जवळील पैशाच्या लोभामुळें मी कसे तरी कंठूं लागलों. एके दिवशीं त्या गोसाव्याच्या जवळ तो कबूल होतो कीं काय ह्मणून पहावयास गेलों मात्र कीं त्यानें माझ्यावर सारखी शिव्यांची लाखोली वाहून देववतील तितके शाप देऊन आपलें डोकें ताड ताड आपटून जीव सोडला ! तिकडे गोसावी मेला आणि इकडे माझी पांचावर धारण बसली. घरीं आलों. साहेबाला सर्व वर्तमान कळविलें. त्यानें करावयाची ती व्यवस्था केली. माझी झोंप आणि माझें जेवण यांला मी सर्वस्वी मुकलों ! तीन दिवस झाले न झाले तोंच मला दोन प्रहरीं वारंटानें पकडून कैद केलें. माझ्या हातून घडलेला खून उघडकीस आला !

कैद करून नेल्या नंतर मी दहा बारा वकील, दोन बारीस्टर दिले. एकंदर रकम पन्नास हजार रुपये खर्चिली. आणि जेमतेम माझ्या वरील खुनाची तोहमत दूर झाली. माझ्या घरीं मी एकटाच कर्ता व घरीं काय ती एकटी बायको. मी कैदेंत. माझी रोकड माझ्या चावींत. ती स्वाधीन

कोणाच्या करावी हा भरंवसा येईना. माझ्या पहिल्या सासऱ्याला आणवून त्याच्या हातून थैल्या मोकळ्या करविल्या. सेशन कोर्टांतून सुटून घरीं आलों. रोकड पाहिली ती चार हजारांची सारी शिल्लक! घर एक होतें. बायकोचे दागिने बायकोच्या स्वाधीन. ते मी ठेवण्यासाठीं मागितले. तिनें कांहीं दिले नाहींत. करीमा बरोबर ते गेले असें तिनें सांगितलें. गप्प बसलों. दोष मुक्त मी झालों. मला पुनः नौकरी द्यावी ह्मणून खटपट चालविली. त्या कामीं रुपये दोन हजार खर्च आला. मी कच्च्या कैदेंत चार पांच महिने होतों. घरीं बायको तीन महिन्याची गरोदर! दोन्ही मुलें एका आठवड्यांत पटकीनें मेलीं. दोन ग्रेडा कमी करून मला कामावर सरकारानें घेतलें. एके दिवशीं कचेरींतून घरींआलों. घरी झोंप लागेना. जेवण जाईना. घरांत फार तर दोन हजार रुपये शिल्लक! माझा पहिला सासरा घरीं आला. "खून व गोसाव्याचें मरण या साठीं शंभर ब्राह्मण घरीं जेऊं घाला" असें त्यानें सांगितलें. ब्राह्मण घरीं जेवावयाला येतना. दोन रुपये दक्षिणा व पंचपक्वान्नाचें जेवण घालण्याचें कबूल केलें, तेव्हां जेमतेम पन्नास ब्राह्मण जेवावयाला आले. कथा, कीर्तनें, पुराणें, देव, देवपूजा यांच्या नादीं लागलों आणि एके दिवशीं जिवाला अनुताप उत्पन्न होऊन चाकरीचा राजीनामा दिला आणि तीर्थें, क्षेत्रें हिंडत निघालों. अन्न कोठेंही कांहीं केल्या जाईना. करीमाच्या आरोळ्या रात्रीं झोंपीं जातांच ऐकूं येण्याच्यें बंद पडेना. माझ्या हातून फांशीं गेलेले सर्व

खुनी माझ्या स्वप्नांत येत. मला शिव्या देत, मला शापीत. माझ्या हातून मार खाल्लेले, माझ्या मुळें कैदेंत गेलेले, माझ्या घरीं पैसे दिलेले, माझ्या सरबराई साठीं आपलें घरचें सामान आणून दिलेले, सर्व रोज रोज मला शिव्या देतात असें स्वप्नांत दिसावें. त्यांच्या शिव्या माझ्या कानीं दर घडीस येत. मला कांहीं चैन पडेना. लाख रुपयां पेक्षां जास्त रुपये मिळविले आणि ते आले तसे गेले याचें दुःख माझ्यानें विसरवेना. घर एवढें मोठें हौसेनें बांधलें; त्यांत खेळण्यास मुलें नाहींत असें आठवलें ह्मणजे मोठ्या दुःखाचा हुंदका येई. बायकोची आठवण झाली कीं करीम, त्याचा खून आणि तिचें गवारपण यांच्या स्मरणानें पोटांत भडका उठत असे. अनेक बायकांचा नाना प्रकारें मी छळ केला त्याचा हा सूड देवानें घेतला. अनेकांचीं घरें ऊनऊन पाण्यानें जाळलीं, त्याचें उसनें यथा योग्य निघालें, खोटीं कर्मै केलीं त्याचा झाडा द्यावा लागला ह्मणून झालें तें ठीकच झालें असें मानण्या मुळें समाधान मात्र होई. जगांत मला सारेजण छीः थूः करीत, माझी निंदा माजवीत, माझ्या थट्टा करीत, माझ्या अप्रतिष्ठा सांगत बसत. मला भलें असें ह्मणणारा एकही प्राणी नाहीं. माझा असा एक प्राणी माझी बायको. तिचे चाळे याप्रकारचे! तेव्हां मला माझा देव आठवला. देव जगांत खरा न्यायी, त्याच्या पुढें सर्व कांहीं व्यर्थ असें माझ्या मनानें घेतलें. ह्या जगाचा पिता देव, ह्या जगाचा धनी देव, ह्या जगांत काय तो तो समर्थ, हें आतां माझ्या मनास

पक्कें कळलें. देवा शिवाय या जगांत जगण्यापेक्षां मरणें बरें. देवाची स्तुति घडत नाहीं असें तोंड घेऊन फिरण्या पेक्षां डुक्कर होऊन नरकांत तोंड खुपसत सुटलेलें बरें; देवाचे गुणानुवाद ऐकण्याचें घडत नाहीं तर गाढव जन्मास आलेलें काय वाईट? अशा विचारां कडे माझें मन एकदांचें वळलें. या जगांत एकटा धनी देव. या अखिल चराचर सृष्टीचा तो खरा चालक; त्याच्या सत्ते शिवाय कांहीं एक नाहीं. राजांचा राजा, धन्याचा धनी, मालकाचा मालक, मनुष्यांचा जन्मदाता, संरक्षण कर्ता आणि संहार करणारा तो एकटाच खरा. मोठा न्यायी, परम दयाळु आणि कडक शासन करणारा, तो एकटा देव हें तत्व माझ्या मनांत बिंबलें. त्याच्या घरीं खरा व शेवटचा न्याय आहे याबद्दल मला कांहीं एक शंका उरली नाहीं. देवाला विस-रून या जगांत राहण्यापेक्षां भ्रूण हत्येनें गर्भांतूनच गळलेलें बरें; देवाची सेवा घडत नाहीं असा देह असण्यापेक्षां फत्तर झालेलें ठीक. इत्यादि विचारांच्या उसळ्या मागून उसळ्या म-नांत येऊं लागल्या आणि तो देव भेटेल कसा? त्या देवाची सेवा माझ्या हातून कोणती व कशी घडेल? व घडावी, याचाच तेवढा विचार हल्लीं माझा चाललेला असतो. देवाला तुष्ट व प्रसन्न करण्यासाठीं काय करावें याच्याहून दुसरें कांहीं एक मला सुचत नाहीं. प्रपंच, प्रपंचासाठीं द्रव्य संपादन; प्रपंचातलीं गोळा झालेलीं व केलेलीं माणसें आणि प्रपंच प्रपंच करीत भटंकणें, यांतलें सारें सौख्य मला आतां कळून चुकलें. देव,

त्याचा महिमा आणि त्याची सेवा इकडे केलेलें दुर्लक्ष्य या-मुळें व्हावयाची तेवढी माझी हानी होऊन चुकली. आतां शिल्लक बाकी कांहीं राहिली नाहीं. माधुकरी मागून ओले कोरडे हे चार भाकरीचे तुकडे गोळा करितों त्याची रुचि फौजदारीच्या नोकरींत तुप साखरेच्या ढिगाऱ्याला कधीं आली नाहीं. येथें संगमावर उघड्या जागेंत जमिनीवर पडतों, येथील झोंप मला कधीं माझ्या विलासांत मिळाली नाहीं. "रावबहादुर केशवराव दादा साहेब फौजदार" याच्या पेक्षां " केश्या स्वयंपाकी " असतों तर मी फार सुखानें आणि आनंदानें राहिलों असतों, असें, एकदां नव्हे शंभरदां आणि रोज रोज, मला वाटतें; पण त्याचा उपयोग आतां काहीं एक नाहीं!

मी लोकांना सांगावयाला गेलों तर माझें कोणी ऐकणार नाहीं. "करून करून थकले आणि आतां देव पूजेला लागले" असें ह्मणतील. शिकलेल्या गोष्टींचा धडा ध्यानांत धरून पुन्हा सावरून प्रपंच करावा तर तें आतां नको. पुरे झालें. पुष्कळ वीट आला. आणि तो आतां नकोही. माझ्या पापांची, मला पाहून, लोकांनां रोज रोज आठवण येईल. माझ्या पापांच्या कथा कुटण्याला लोकांना मला पाहून पुष्कळसा चेव येईल. आणि बायको आणि पोरें यांची जोड तरी मला काय करावयाची ? असा मनांत विचार येतो. पण जगांतल्या पातक्यांच्या कृत्यांला थोडा अळा बसावा, पातकी कृत्यें कमी व्हावींत, उदाहरण पाहून वेळींच माझ्या सारख्यांना पश्चात्ताप

व्हावी एवढी मात्र माझी भारी उत्कट इच्छा आहे. माझ्या सारखे जगांत दुसरे पातकी निपजूं नयेत असें मला वाटत आहे. ह्मणून माझ्यानें काम होत नाहीं तें दुसरे कोणी तरी करावें अशी माझी भारी इच्छा आहे. देव, त्या देवाची भीति, त्या जगदात्म्याचा न्याय, त्या परम कारुणिक परमेश्वराची भक्ति आणि त्या जगन्निवासाची सेवा या जगांत लोकांच्या मनावर ठसावी. ठसलेली लोकांनीं विसरूनये, पापाकडे प्रवृत्ति लोकाची नसावी. पापाचे तडाखे सोसण्याचें दुःख कोणी अनुभवूं नये असें मला घडी घडीला वाटतें. यास्तव माझी ही कर्मकथा जगाला सांगा. माझ्या बाधवांना ही माझ्या कर्माची कहाणी कळवा आणि माझ्या हातून ज्यांचा छळ झाला, माझ्या हातून नाहक्क ज्या बिचाऱ्याचे अनेक हाल झाले, माझ्या मुळें ज्यांचे संसार मातीस मिळाले, मी ज्याचीं घरें दारें धुळीस मिळविली, ज्यांचीं घरें या दुष्ट पातक्यानें धुऊन काढिलीं, ज्या आयां बहिणी या चांडाळानें नाडिल्या, ज्या भल्यांच्या अब्रूवर या अघोर कर्म्यानें सारखे हल्ले करून प्राणापेक्षां प्यार अब्रूला धुळींत मिळविलें आणि ज्यांना यम यातने सारख्या हालांत दिवस काढावयास लावून कैकांच्या प्राणाच्या आहुती घेतल्या, त्या सर्व भल्या माणसांच्या चरणीं माझा हा पश्चात्ताप अर्पण मीं करीन ह्मणतों, पण तो कसा करावा हें मला साधत नाहीं. तो साधेल अशी कांहीं तजवीज करा. माझ्यानें आतां जास्त कांहीं सांगवत नाहीं. रौरव नरकाचें साधन मीं आपल्या

हातानें तयार करून ठेविलें आहे, तें भोगिल्या शिवाय मला गत्यंतर नाहीं मी स्वतः नरकांत जाऊन खिचपत पडेन तो पडेन, पण, माझ्या वाडवडिलांना देखील खेंचून नेण्या इतकी पुण्याई—त्यांच्या पोटीं मला त्यांनीं जन्म दिला त्याची फेड करण्यासाठीं—मीं संपादिली आहे! माझ्या सारख्या अनन्वित कर्मे करणाऱ्या दुष्टबुद्धि, दुर्दैवी, दुराचाऱ्यांच्या हकीकती मी गोळा करून ठेविल्या आहेत, त्या लोकांना सांगून त्यांना शुद्धीवर आणण्याचें पुण्य कोणी घेईल तर पहावे अशी माझी इच्छा ईश्वर पूर्ण करो म्हणजे झालें.

जाहिरात.

ॐ नमः श्रीगणेशाय

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली.

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित न आला तर पैसे परत देऊं व त्यांचें आरोग्यार्थ आणखी एखादे उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

म द ना मृ त सं जी वि नी

धातुवर्धक अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक. कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रियशिथिलता, कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक सवयींनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि,

वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ति भरपूर वाढून मनास उत्साह देतात; दूध व जडान्न भरपूर पचूं लगतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळीच नसून स्त्रिया, पुरुष व मूलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास उपयोगी अत्यंत आहेत. गुटिका रुपायाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपय. वर कितीही घेणाऱ्यास टपालखर्च माफ. चार रुपयाचे आत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही० पी० नें खालील पत्यावर मिळतील. दर ३५ गो० १ रु०; ७५ गो० २ रु०, ११५ गो० ३ रु०. १६५ गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १०. रुपये.

आमचेकडे याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधे असून ग्रंथस्थरसायणं, धातूंचीं भस्में, पाक, गुटिका, वगैरेही माफकदराने मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही पी नें पाठवूं.

सूचनाः—अलीकडे २।३ वर्षें आजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यानी आमचेच जाहिरातीची हुबेहुब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत, करिता आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील, त्यानीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, ता. दापोली जि० रत्नागिरी

ग्रंथियुक्त तापावर दवा.

अलीकडे ह्या ग्रंथियुक्त तापाच्या साथीच्या दिवसांत जर बाटलीवाला यांचें तापावरील रामबाण औषध एग्यु-मिक्श्चर व गोळ्या ह्या सारखा स्वल्प उपाय करण्याची हयगय झाली तर आयुष्यांतील यातना किती तरी वाढतात !

बाटलीवाला यांचें एग्युमिक्श्चर व गोळ्या एकांतर, चातुर्थिक, हिंवताप व सौम्य ग्रंथियुक्त ताप (प्लेग), वगैरे सर्व प्रकारच्या तापांवर रामबाण व अचुक लागू पडतात; ह्याविषयीं आतां सर्वत्र प्रसिद्धी आहे. यांत पारा, सोमल, अफू वगैरेसारखे अपायकारक पदार्थ बिलकुल नाहींत. लहानांपासून थोरांपर्यंत स्त्री पुरुषांना घेण्यायोग्य आहेत. तर मग अगोदरच शहाणे होऊन दुःखमुक्त कां होऊं नये. योग्य वेळीं योग्य उपाय करा व बाटलीवाला यांचें तापावरील रामबाण औषध एग्युमिक्श्चर व गोळ्या घेऊन कष्टप्रद तापाच्या तडाक्यांतून मोकळे व्हा.

बाटलीवाला यांच्या एग्युमिक्श्चर व गोळ्या त्यांच्या गुणाविषयीं असंख्य शिफारसपत्रांपैकीं कांहीं खालीं देतों:—सर्जनमेजर जेकरसाहेब ह्मणतात. "ह्या सारखा निर्भय व विश्वसनीय दुसरा उपाय नाहीं." सर्जन मेजर रिपॉर्टर साहेब ह्मणतात. "हीं औषधें अत्यंत गुणकारक आहेत अशी मी खात्री देतों." जे. वाय. लँग साहेब (हिंदुस्थानांतील फ्रीमेसनरींचे मोठे मास्तर) ह्मणतात. हीं वापरल्याच्या योगानें तावडतोब गुण आला."

व्हेंग रेव्हरंड बी. फवनँड मांठे पाद्रीसाहेब ह्मणतात. "ही गुणकारक आहेत यांत शंका नाहीं." जी. एस. रीस्टी साहेब. एल. सी. ई., ह्मणतात. "जलद लागूं पडण्याच्या कामास या सारखें दुसरें औषध नाहीं." पी जे. डेली साहेब चीफ गार्ड सदर्न मराठा रेलवे ह्मणतात. "मृत्युमुखीं पडलेल्यास हीं औषधें केवळ अमृततुल्य आहेत."

बाटलीवाला यांचें तापावरील रामबाण एग्युमिक्श्चर व गोळ्या व बाटलीवाला कंपनीचें पटकीवर रामबाण कोलेरल ही सर्व ठिकाणीं विकत मिळतील किंवा एकटेच बनविणार डॉ. एच. एल. बाटलीवाला. वर्ली, दादर, मुंबई. यांजकडे मिळतील. शिशीची किंमत १ रुपाया व्यापाऱ्यांस कमीशन मिळेल.

मौजच मौज. हंसूंच हंसूं.

एकवार वाचा ! वाचा ! !

कांहीं, तुमचा वेळ आनंदांत जावा अशी तुमची इच्छा आहे काय ? असल्यास खालील पुस्तकें एकवार वाचा. मोठमोठ्यांचे अभिप्राय मिळालेले आहेत.

नवीन तयार झालेलीं पुस्तकें.

बंधुप्रेम अथवा सुंदरराव व हंबिरराव, किं० १॥ रु० भगनीप्रेम अथवा कामांध राजपुत्र, किं. १ रुपया. दोन्ही एकदम घेणारांस २ रुपयांस मिळतील. व्ही. पी. टपालखर्च माफ.

वासुदेव जनार्दन लेले, बुकसेलर, मिरज

आवक माल:—शेंकडा एक रुपाया अडतीवर विक्री केला जातो.

सोनें, चांदी खरेदी व विक्रीचें काम:—शेंकडा २ आणे अडतीवर केलें जातें.

विक्रीस आलेल्या मालावर:—शेंकडा ७५ टक्के अगाऊ रक्कम देण्यांत येते.

जवाहीर, रेशीम, सूत, कापड, भुसार, लोखंड, स्टेशनरी वगैरे माल शेंकडा १ टक्का अडतीनें बिछाइतां-करितां खरेदी करून पाठविला जातो.

सूचना.

१ माल खरेदी व विक्रीच्या खर्चासंबंधाचे नियम फार माफक आहेत.

२ एकंदर कामें फार कसोशीनें व दक्षतेनें केलीं जातात.

३ कमजास्त माहिती पाहिजे असल्यास अगर विशेष ठराव करणें असल्यास त्याबद्दल बिछाइतांनीं समक्ष अगर पत्रद्वारें खुलासा करून घ्यावा.

४ ठोकबंद तसेंच रोखीनें व्यवहार करणाऱ्या बिछाइतांचीं कामें विशेष सवलतीनें केलीं जातील.

गणेश रामचंद्र मांजरेकर आणि कंपनी,

व्यवस्थापक.

मोती बाजार, काळबादेवी पोष्ट, मुंबई.